सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# सेतू -अभ्यास

## (Bridge Course)

## विषय - मराठी

### (इयत्ता - तिसरी)

शैक्षणिक वर्ष २०२१ – २२

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

# सेतू -अभ्यास (ब्रिज कोर्स) : इयत्ता - तिसरी


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. वंदना कृष्णा**, (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा.विशाल सोळंकी**, (भा.प्र.से.)
  आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा.राहुल द्विवेदी**(भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे,** उपसंचालक (भाषा व समता विभाग)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **नीता जाधव,** उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता, मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन सहाय्य** : **डॉ. नंदा भोर, अश्विनी नरवणे,** विषय सहायक, मराठी विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती गटप्रमुख** : **डॉ.बाबासाहेब बडे, अधिव्याख्याता,**
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नाशिक
- **निर्मिती गटसदस्य** :
  १) **समाधान शिकेतोड**, विषय सहायक, जि.शि.प्र.सं., उस्मानाबाद.
  २) **बाळासाहेब लिंबीकाई**, मुख्याध्यापक, समर्थ प्राथमिक आश्रमशाळा, बेडग, ता.मिरज, जि. सांगली
  ३) **आशा सकट,** सहायक शिक्षक, जि. प. प्राथ. शाळा, कोयाळी पुनर्वसन, शिक्रापूर, ता. शिरूर, जि. पुणे .
  ४) **ज्ञानेश्वरी परदेशी**, सहायक शिक्षक, जि. प. प्राथ. शाळा, पवार वस्ती, लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे
  ५) **आशा सूर्यकांत तेरवडिया,** जिल्हा परिषद शाळा वडाची वाडी, ता. हवेली, जि. पुणे.

## विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो,

मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. तुमचं खूप खूप कौतुक! आता नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होतंय. पुन्हा जोमानं आपल्याला सुरुवात करायचीय. सुरुवातीला काही दिवस आपणाला मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी करायला हवी जेणेकरून या वर्षीच्या अभ्यासक्रमासाठी चांगली पूर्वतयारी होईल. ही पूर्वतयारी करणे सोयीचे व्हावे यासाठीच हा सेतू -अभ्यास तयार करण्यात आला आहे. मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू -अभ्यास तुम्हाला मदत करणार आहे.

त्यासाठी तुम्हाला काय करायचं? तर हा सेतू -अभ्यास दिवसनिहाय क्रमाने सोडवायचा आहे. यात वेगवेगळ्या कृतींचा समावेश आहे. या कृती सोडवताना तुम्हांला मजा येईल. पण लक्षात ठेवा, या कृती दिवसनिहाय तयार केलेल्या आहेत. तुम्ही दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृती स्वप्रयत्नाने सोडवाव्यात. कृती सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्यावी. प्रत्येक कृती मध्ये दिलेला पाठ्यांश अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी व्हिडीओ लिंक दिल्या आहेत, त्यांचा उपयोग करून संकल्पना समजून घेण्यास मदत होईल.

आणि हो, हा ४५ दिवसांचा सेतू -अभ्यास करताना यामध्ये दर पंधरा दिवसांनी तुम्हांला एक छोटीशी चाचणी सोडवायची आहे. चाचणी स्वतः एकट्याने सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर शिक्षकांकडून तपासून घ्या.

हा सेतू -अभ्यास सोडविताना काही भाग जसे की, चला सराव करू या, सक्षम बनू या यामधील कृती मध्ये अडचण आल्यास, न समजलेला किंवा अवघड वाटणारा भाग समजून घेण्यासाठी शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

**हा सेतू - अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !**

# शिक्षक / पालकांसाठी सूचना

कोविड १९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू -अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू -अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदर अभ्यासात क्षेत्र, कौशल्य, संकल्पना व अध्ययन निष्पत्ती/क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संकल्पनाप्रमाणे संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी**'जाणून घेऊ या'**,त्या संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या'**, मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** व मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने आधी चिकित्सक विचार करावा,सर्जनशील व्हावे,अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **'कल्पक होऊ या'**या सदरांचा समावेश केला आहे.
- संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून सर्वच कृतीमध्ये दीक्षा ॲप, क्यु आर कोड इ. ची मदत घ्यावी.
- मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू -अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

- सेतू -अभ्यास  एकूण ४५दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू -अभ्यास  दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवावे याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.
- सदरील सेतू -अभ्यास  हा शिक्षकांसाठी असला तरीही शाळा ऑफलाइन सुरू नसल्याकारणाने याचा वापर करून पालक, शिक्षक मित्रयांच्यामदतीने विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व पुढील इयत्तेत शिकावयाच्या कृतींची किंवा अभ्यासक्रमाची पूर्वतयारी घेऊ शकतील.
- या सेतू अभ्यासात दिलेल्या अध्ययन कृती या मार्गदर्शक असून शिक्षक आपल्या वर्गाच्या व विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार  विद्यार्थ्यांच्या अध्ययन संदर्भात इतर आवश्यक त्या कृती घेऊ शकतात.
- वयानुरूप समकक्ष वर्गातील मुलांसाठी SCERT मार्फत तयार केलेल्या विद्यार्थी मित्र व शिक्षक मार्गदर्शिका यांचा संदर्भ म्हणून उपयोग करावा.

**सेतू - अभ्यासाच्या अंमलबजावणीकरीता आपणास हार्दिक शुभेच्छा!**

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ,महाराष्ट्र ,

# सेतू -अभ्यास

**इयत्ता – तिसरी** **विषय –मराठी** **कालावधी – ४५ दिवस**

## ➢ उद्दिष्टे-:

1. कोविड च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनात अध्ययनाविषयी आत्मविश्वास निर्माण करून १९-शिकण्यासाठी आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे.
2. विद्यार्थ्यांना गत शैक्षणिक वर्षातील संबंधित इयत्तेच्या भाषा अध्ययनातील अंतर भरून काढण्यास मदत करणे.
3. विद्यार्थ्यांना मागील इयत्तानुरूप भाषा विषयातील अपेक्षित अध्ययन निष्पत्तीनुसार समजपूर्वक वाचनाची संधी उपलब्ध करून संबंधित क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत करणे.
4. विद्यार्थ्यांना मागील इयत्तेशी जोडून घेण्यासाठी स्वयंअध्ययनासाठी उपयुक्त अशा आनंददायी व कृतियुक्त आशयाची निर्मिती करणे.
5. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त .होण्याची संधी उपलब्ध करून देणे (लेखन)

## ➢ अपेक्षित कौशल्य /संकल्पना-:

1. मौखिक भाषा विकास-
2. ध्वनीची जाण-
3. लिपीची जाण -
4. वाचन-
5. लेखन -

# अनुक्रमणिका


| दिवस | क्षेत्र/ कौशल्य / संकल्पना | पृष्ठ क्रमांक | दिवस | क्षेत्र/ कौशल्य / संकल्पना | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | कृतियुक्त गाणी | ८ | २४ | र च्या खुणा | ३५ |
| २ | गोष्ट सांगणे | ९ | २५ | कविता वाचन | ३७ |
| ३ | गप्पा मारणे | १० | २६ | प्रकट वाचन | ३९ |
| ४ | स्वरचिन्हांची ओळख | ११ | २७ | अनुभव लेखन | ४१ |
| ५ | चित्रवाचन/चित्रवर्णन | १२ | २८ | जाहिरात वाचन | ४२ |
| ६ | घटनाक्रम | १३ | २९ | विनोद वाचन | ४३ |
| ७ | गोष्ट सांगणे | १४ | ३० | **चाचणी क्रमांक –२** | ४५ |
| ८ | कथा वाचन | १५ | ३१ | कविता वाचन | ४६ |
| ९ | चित्रावरून लेखन | १७ | ३२ | ऋ स्वरचिन्हाचा परिचय | ४८ |
| १० | स्वरचिन्ह परिचय | १८ | ३३ | चित्रावरून लेखन | ५० |
| ११ | शब्द साखळी | २० | ३४ | जोडाक्षरयुक्त शब्दांचे श्रुतलेखन | ५२ |
| १२ | पाठवाचन | २१ | ३५ | अनुवाचन | ५३ |
| १३ | शब्दावरून वाक्य सांगणे. | २२ | ३६ | प्रकटवाचन | ५४ |
| १४ | विरामचिन्हे | २३ | ३७ | तक्ता/दिनदर्शिका वाचन | ५५ |
| १५ | **चाचणी क्रमांक –१** | २४ | ३८ | वाचनपाठ | ५७ |
| १६ | स्वल्पविराम | २५ | ३९ | जोडाक्षरयुक्त शब्दांचे वाचन | ५९ |
| १७ | ऐकलेल्या गोष्टी सांगणे | २६ | ४० | अनुभव लेखन | ६१ |
| १८ | जोडाक्षरांची ओळख | २७ | ४१ | प्रकट वाचन | ६२ |
| १९ | श्रुतलेखन | २९ | ४२ | स्व-लेखन | ६३ |
| २० | व्यावसायिकाला प्रश्न विचारणे | ३० | ४३ | अनुभवलेखन | ६५ |
| २१ | प्रकट वाचन | ३१ | ४४ | अनुभवलेखन | ६७ |
| २२ | जोडाक्षरे | ३२ | ४५ | **चाचणी क्रमांक – ३** | ६९ |
| २३ | र च्या खुणा | ३३ | | | |

## दिवस -१

**क्षेत्र :मौखिक भाषा विकास**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण ,भाषण**

**संकल्पना /संबोध :- कृतियुक्त गाणी**

**अध्ययन निष्पत्ती :**

- शब्दांच्या आणि ध्वनीच्या उच्चारांची मजा घेत लय आणि ताल असणारे शब्द तयार करतात.उदा.एक होता कावळा ,जरासा बावळा इ . (इयत्ता दुसरी)
- कविता योग्य आरोह अवरोहासांसह, योग्य गतीने म्हणतात. (इयत्तातिसरी)

➢ **जाणून घेऊ या** :

- शिक्षकानी मुलांना त्यांच्या भावविश्वातील विषयांवरील कृतियुक्त गाणी साभिनय म्हणून दाखवा.
- त्यात परिसरातील स्थानिक बोलीतील कृतियुक्त गाण्यांचा समावेश करावा.

➢ **सक्षम होऊ या** :

- शिक्षक कृतियुक्त साभिनय गाणे घेतात.विद्यार्थी शिक्षकांच्या मागे म्हणतात, कृती करतात. मुले भाषेच्या तालबद्धतेचा ,गेयतेचा आनंददायी अनुभव घेतात.
- भाषेतील ध्वनींची जाण विकसित होण्यास मदत करतात.

➢ **सराव करू या** :

- परिसरातील स्थानिक बोलीतील कृतियुक्त गाण्यांचा उदा.अभंग,ओव्या,भजन इ. यांचा सराव घ्यावा .

➢ **कल्पक होऊ या**:

- मुलांच्या व पालकांच्या मदतीने घरच्या भाषेतील गाण्यांचा संग्रह करा.
- मुलांच्या घरच्या भाषेतील मूळ गाणी,त्याच गाण्यांचे मराठीत भाषांतर करून दोन्ही भाषेतील गाणी कृतियुक्त पद्धतीने म्हणा.

## दिवस -२

**क्षेत्र :मौखिक भाषा विकास**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण, भाषण**

**संकल्पना /संबोध :- गोष्टी सांगणे, ऐकवणे**

**अध्ययन निष्पत्ती :**

- **गप्पा, गोष्टी, कविता लक्षपूर्वक ऐकतात, स्वत:च्या भाषेत सांगतात. (इयत्ता दुसरी)**
- **ऐकलेल्या गोष्टी, कविता, विषय, पात्र इ.बाबत चर्चा करतात, स्वत:च्या पद्धतीने, स्वत:च्या भाषेत व्यक्त करतात. (इयत्ता –तिसरी)**

➢ **जाणून घेऊ या** :

- शिक्षक रोज तोंडी गोष्टी मुलांना सांगतील. गोष्टीचे पुस्तक वाचून दाखवतील.
- मुलांचे भावविश्व, परिसर व पूर्वानुभव लक्षात घेऊन गोष्टीची निवड करतील.

➢ **सक्षम होऊ या :**

- शिक्षक सुरुवातीला छोटी वाक्य ,सोपी भाषा व पात्रे कमी असणाऱ्या गोष्टींची निवड करतील
- गोष्ट सांगताना आवाजातील चढ उतार, गती, लय यांकडे लक्ष देतील.मुलांना माहित असणारी गोष्ट सांगण्यास संधी द्यावी.
- इतरही गोष्टी मुलांना सांगाव्यात. मते, प्रतिक्रिया जाणून घ्याव्यात.

➢ **□सराव करू या** :

- शिक्षकगटात मुलांना गोष्टी सांगण्यास लावतील.
- गटात गोष्टीवर चर्चा करण्यास सांगतील. उदा.पात्रे, संवाद

➢ **कल्पक होऊ या** :

- एखाद्या घटनेचा घटनाक्रम सांग. तुला आवडणारी गोष्ट तुझ्या मित्राला आवाजातील चढ उतारासह सांग.
- गोष्टीतील काय आवडलं? काय आवडलं नाही ते सांग?

## दिवस -३

**क्षेत्र :-मौखिक भाषा विकास**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण ,भाषण**

**संकल्पना / संबोध :-**गप्पा मारणे औपचारिक /अनौपचारिक

### अध्ययन निष्पत्ती :

- विविध उद्देशांसाठी स्वतःच्या भाषेचा किंवा/आणि शाळेतील मध्यम भाषेचा वापर करून गप्पागोष्टी करतात. उदा.माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे,स्वतःचे अनुभव सांगणे इ . (इयत्ता दुसरी)

➢ **जाणून घेऊ या** :

- शाळेत येताना आज तू काय काय पाहिले ? लॉकडाऊन मध्ये तू घरी काय काय केले?.यासारख्या प्रश्नांनी मुलांना बोलते करूया.
- नंतर एखादा(मुलांच्या भावविश्वातला ) विषय देऊन त्यावर गप्पा माराव्यात . उदा.एखाद्या फुलाचे नाव सांगून त्यचा रंग ,वास,इत्यादी वर गप्पा माराव्यात.
- विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून ,स्वतःचा अनुभव सांगून बोलते करावे.

➢ **सक्षम होऊ या** :

- मित्रामित्रांमध्ये एकमेकांना प्रश्न विचारण्यास सांगून बोलते होण्यास सांगावे.
- तुला कोणता खेळ आवडतो ?किंवा १,२ चित्र दाखून तुला कोणते चित्र आवडले ?ते विचारावे .
- असा विविध प्रकारे सराव घेऊन मुलांना बोलते करावे.मुलांना आपले विचार योग्य शब्दात मांडण्याची संधी उपलब्ध करून देतात.

➢ **सराव करू या :**

- एकमेकांमध्ये छोटा अनुभव ,प्रसंग ,एखादी घटना इत्यादीवर विचार करण्याची सवय लावावी.

➢ **कल्पक होऊ या**:

- तुझ्या मित्राला काल तू शाळेत आईसोबत येताना कोणता प्रसंग घडला ते तू तुझ्या भाषेत सांग.

## दिवस -४

**क्षेत्र- लिपी परिचय**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण ,भाषण,वाचन**

**संबोध/संकल्पना - स्वरचिन्हांची उजळणी**

**अध्ययन निष्पत्ती-** अक्षर व ध्वनी यांच्या संबंधांचा वापर करणे, शब्द ओळखणे, पूर्वानुभव आणि माहितीचा वापर करून अर्थाचा अंदाज करणे. (दुसरी)

### ➢ जाणून घेऊ या :

मुलांना जोडाक्षरविरहीत सर्व शब्दांचे श्रुतलेखन द्यावे. जास्तीत जास्त सर्व स्वरचिन्हांचा समावेश करावा. श्रुतलेखन तपासल्यानंतर मुलांना अक्षरे व स्वरचिन्हांचा परिचय कितपत आहे हे समजेल त्यानुसार त्याचा सराव घेता येईल.

उदा- गट १) नयन, मका, पेन, किमया, पाणी, मुलगा, दूर, वैशाली, चौकोन, थंडी

### ➢ सक्षम होऊ या :

ज्या स्वरचिन्हांमध्ये जास्त मुलांना अडचणी आहेत त्या स्वरचिन्हांचा परीचय करवून द्यावा.परीचय करून देताना काना,मात्रा,वेलांटी असा शब्दप्रयोग न करता स्वरचिन्हांचा उच्चार कसा होतो ते सांगावे.(उदा क ला आ जोडल्यावर का होतो) सर्व अक्षरांना स्वरचिन्ह जोडून वाचन घ्यावे.व त्यापासून तयार होणारे शब्द फळयावर लिहून वाचन घ्यावे.

### ➢ सराव करू या :

स्वरचिन्हयुक्त शब्दकार्ड गटात वाचायला द्यावे व ते लिहायला सांगावे.
मुलांना पाठ्यपुस्तक /वर्तमानपत्र/इतर पुस्तकांमधून असे शब्द शोधायला सांगावे व त्याची यादी तयार करावी.

### ➢ कल्पक होऊ या:

मुलांना दिलेल्या अक्षरतक्त्यांतील अक्षरांचा वापर करून अर्थपूर्ण शब्द शोधून लिहायला सांगावे.नमुना-

| | | | |
|---|---|---|---|
| क | पा | ट | क |
| गो | टी | पा | णी |
| पा | च | ल | ता |
| ळ | हा | क | प |

## दिवस -५

**क्षेत्र :मौखिक भाषा विकास**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण ,भाषण**

**संकल्पना /संबोध :-चित्रवाचन / चित्रवर्णन**

**अध्ययन निष्पत्ती :** चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात. (इयत्ता दुसरी)

- **जाणून घेऊ या** :-
  - एखादे चित्र दाखवून चित्रातील तपशीलाकडे लक्ष वेधून घ्यावे.नंतर प्रश्न विचारावेत .चित्राच्या मदतीने मुलांना स्वतःचे अनुभव ,निरीक्षण करण्यास सांगावे.
- **सराव करू या**:
  - परिसरातील ,परिचयाची चित्र व छायाचित्रांचा संग्रह करून त्यावर चित्रगप्पा,चित्रवर्णन याचा सराव घ्यावा.मुलांना सूचक प्रश्न विचारून बोलते करावे.उदा.-चित्रातील व्यक्तीकाय बोलत असतील? चित्रात दिसणाऱ्या ठिकाणी तू कधी भेट दिली आहेस का?
- **कल्पक होऊ या**
  - वस्तू /प्राणी /पक्षी याचे निरीक्षण करून आपले विचार /निरीक्षणे आपल्या

शब्दात मांडण्याचा प्रयत्न करायला सांगावा. पूर्ण वाक्यात बोलण्यास प्रोत्साहन .द्यावे.

संबंधीत चित्राला जोडून आपला अनुभव सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.

चित्राचे वर्णन लिहण्यास सांगावे.

## दिवस -६

**क्षेत्र :मौखिक भाषा विकास**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण ,भाषण**

**संकल्पना /संबोध :-घटनाक्रम**

**अध्ययन निष्पत्ती :**

- आपल्या आसपास घडणाऱ्या व ऐकलेल्या ,पाहिलेल्या गोष्टीचा संबंध जोडून त्याबाबत गप्पागोष्टी करतात. व्यक्त करतात, चर्चा करतात, प्रश्न विचारतात. (इयत्ता –दुसरी)
- आपल्या परिसरात घडणारे प्रसंग/घटना आणि भिन्न परिस्थितींत आलेले स्वतचे अनुभव व्यक्त करतात:, त्याविषयी चर्चा करतात.

### ➢ जाणून घेऊ या :

○ एखादी कृती निश्चित करून ( उदा.सरबत करणे ,भाकरी करणे ) त्यासाठी लागणारे साहित्य जमा करून ,सर्व मुलांना दिसेल अशी कृती घ्यावी.मराठी साहित्य पेटीतील साहित्याची मदत घेता येईल. (सा.क्र म .८/१०/०१ ते म ८/१०/१० )

### ➢ सक्षम बनू या :

○ शिक्षकांनीकाही छोट्या कृती क्रमाने घ्याव्यात .प्रत्येक छोटी पायरी घेताना मी काय करत आहे हे बोलुन दाखववावे. मुख्य कृतीत अनेक लहान कृतींचा समावेश आहे हे लक्षात आणून द्यावे.

○ एका घटनेत अनेक छोट्या छोट्या कृती क्रमाने करायच्या असतात हे समजावून सांगतील,अनुभव देतील.

### ➢ सराव करू या:

○ शिक्षकांनी मुलांच्या अनुभव विश्वातील एखादी घटना घेऊन घटनाक्रम चा सराव घ्यावा. दुसऱ्या दिवशी मुलांकडून आधी काय केले ,नंतर काय केले हे विचारून फळयावर लिहावे.याप्रमाणे सराव घ्यावा.

### ➢ कल्पक होऊ या :

○ त्या त्या परिसरातील व मुलांच्या अनुभवविश्वातील घटना प्रथम घ्याव्यात.त्यातून निरीक्षण करण्याची सवय व घटना क्रमाने सांगण्याची सवय विकसित होईल.

○ मित्राला /मैत्रिणीला एखादी घटना सांगायला लावावी.उदा- तुझ्या घरी भाकरी कशी करतात ते सांग.

# दिवस -७

**क्षेत्र :मौखिक भाषा विकास**
**कौशल्य /क्षमता :- श्रवण, भाषण**
**संकल्पना /संबोध :-गोष्ट सांगणे**

**अध्ययन निष्पत्ती:**

- चित्रातील व चित्रमालिकातील घडणाऱ्या घटना,कृती आणि पात्रांना एकसंधपणे गोष्टीरूपात समजून घेऊन त्याचा आनंद घेतात. (इयत्ता –दुसरी)
- गोष्टी किंवा इतर साहित्य प्रकार समजून घेऊन त्यात स्वतःच्या माहितीची भर घालतात.
(इयत्ता –तिसरी)

## ➢ जाणून घेऊ या :

○ **शिक्षक मुलांना** त्यांच्या भावविश्वातील चित्रावरून गोष्ट कशी तयार करायची ते सांगतील.किंवा आपण सांगितलेल्या ,परिसरात ऐकलेल्या गोष्टीतील घटनाक्रम मुलांना विचारतील.

## ➢ सक्षम होऊ या :

○ ऐकलेले प्रसंग ,घटना यांची क्रमबद्ध मांडणी करण्याची सवय लागेल व स्वतःच्या भाषेत सांगण्याची सवय मुलांना लागेल.ऐकलेली गोष्ट सांगायची आहे त्यामुळे लक्षपूर्वक ऐकण्याची सवय लागेल.

○ परिसरातील घडलेली घटना सांगितली तरी त्याचा स्वीकार करावा. गोष्ट सांगितल्याने उच्चार स्पष्टता वाढते हे लक्षात आणून देतात.

## ➢ सराव करू या:

○ **शिक्षक** मुलांना त्यांनी ऐकलेली गोष्ट सांगण्याची संधी उपलब्ध करून देतील.एखादी अपूर्ण गोष्ट /प्रसंग स्वतःच्या मनाने पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देतील,मुलांच्या बोलीभाषेचा स्वीकार करावा.

## ➢ कल्पक होऊ या :

○ चित्रावरून गोष्ट,ऐकलेली गोष्ट सांगण्याचा सराव घेतील.पुर्वानुभावाशी जोडणी करणे ,अंदाज बांधणे,तर्क करण्याची सवय मुलांना लागेल ,संधी मिळेल.

दिवस -८

**क्षेत्र:- वाचन.**

**कौशल्य/क्षमता- वाचन**

**संकल्पना /संबोध :-कथावाचन**

**अध्ययननिष्पत्ती:-आपल्या आसपास घडणाऱ्या व ऐकलेल्या, पाहिलेल्या गोष्टींचा (उदाकथा ., कविता, पोस्टर्स, जाहिरातसंबंध जोडून त्याबाबत (गप्पागोष्टी करतात.(इयत्ता –दुसरी)**

## ➢ जाणून घेऊ या.

- शिक्षकांनी लोभी कुत्रा ही चित्रकथा मुलांना दाखवावी.
- मुलांना चित्रकथेचे निरीक्षण करायला सांगावे. मुलांना चित्रकथेचे वाचन करण्यास प्रवृत्त करणारे प्रश्न विचारावेत. जसे की-

1) खालील चित्रे नीट बघ, चित्रात काय काय दिसते ते सांग.
2) घरी तुला कोण गोष्ट सांगते ?
3) तु तुला आवडणारी गोष्ट मित्रांना, लहान भावाबहिणीला सांगतो / सांगते का ?
4) असे प्रश्न विचारून चित्रकथेच्या वाचनाबद्दल मुलांच्या मनात उत्सुकता निर्माण करावी.

## ➢ सक्षम बनू या

शिक्षकांनी मुलांना चित्रांचे निरीक्षण करुन सलग चित्रवर्णन करण्यास व त्यावरून चित्रकथा वाचन करण्यास प्रोत्साहित करावे.

१) सर्व चित्रे क्रमाने बघ .

२) चित्रात घडणाऱ्या कृतीतून तुला काय वाटते/ काय समजले हे सांग .

३) चित्रात घडणाऱ्या कृती क्रमाने सांग.

४) शेवटचा रकाना रिकामा आहे, मग गोष्टीच्या शेवटी काय घडले असेल विचार कर आणि सुरूवातीपासून शेवटपर्यंत गोष्ट सांग.

५) गोष्टीचा शेवट अजून काही वेगळा होऊ शकतो का याची मित्रांबरोबर चर्चा कर.

अशाप्रकारे विविध प्रश्न विचारून शिक्षक मुलांकडून चित्रकथेचे वाचन करून घेतील.



## ➢ सराव करू या

१)शिक्षक विद्यार्थ्यांना मराठी साहित्य  पेटीतील विविध चित्रकथा गटात / वैयक्तिक वाचनास देऊन मुलांकडून चित्रकथेचे वाचन करून घेतील.

२) चित्रकथेत येणारे नवे शब्द फळ्यावर लिहून त्यांचे वाचन करून घेतील.

३) चित्रकथेचा शेवट अजून वेगळा होऊ शकतो का? यावर चर्चा घेतील.

## ➢ कल्पक होऊ या.

○ विद्यार्थ्यांनी पुढील कृती कराव्यात.

1) तुम्हाला आवडलेल्या चित्रकथेचे सादरीकरण करा.

2) विविध माध्यमांतून उपलब्ध होणा-या चित्रकथांचा संग्रह करा.

दिवस -९

क्षेत्र :- मौखिक भाषा विकास, लेखन

कौशल्य /क्षमता :- वाचन, लेखन

संबोध /संकल्पना : चित्रावरून लेखन

अध्ययन निष्पत्ती:- १) ऐकलेल्या किंवा मनातल्या गोष्टींना स्वतच्या पद्धतीने आणि:वेगवेगळ्या प्रकारे चित्रं/शब्द वाक्यांद्वारे लिखित स्वरूपात/अभिव्यक्त करतात.(इयत्ता दुसरी)

२) स्वतच्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरविलेल्या कृतीअंतर्गत:जागरूकतेने व स्व नियंत्रित पद्धतीने लेखन-करतात. (इयत्ता तिसरी )

- **जाणून घेऊ या :-**



- शिक्षक,पालक मुलांशी ऐकलेल्या चित्रांवर गप्पा मारतील. त्यावर चर्चा करतील.चित्रांवर अंदाज बांधायला लावणारे,तर्क करणारे प्रश्न विचारतील. आकलन,उपयोजन,विश्लेषण सर्जनशीलता (अभिव्यक्तीच्या) पातळीवर प्रश्न विचारावेत. सर्व विद्यार्थ्यांना बोलते करावे.
- यासाठी परिचित चित्रांचा वापर करावा.
- **सक्षम होऊ या:-**
- विद्यार्थ्यांना परिचित चित्र दाखवून त्याचे तोंडी वर्णन करण्यास सांगावे.
- विद्यार्थ्यांना परिचित चित्र दाखवून त्याचे लेखी वर्णन कसे करावे याबद्दल सांगावे. चित्रांमधील वस्तूंचे निरीक्षण करून त्याची यादी लिहावी.आपल्या अनुभवाशी चित्र कसे जोडावे.याबद्दल सांगावे.सुरुवातीला चित्रातील वस्तूंची यादी लिहण्यास सांगावी.त्या नंतर त्यातील तपशिलाचे वर्णन करण्यास सांगावे.
- **सराव करू या:-**





पाठ्यपुस्तकातील पान क्र. १२ वरील या दोन चित्रांवर दोन –तीन वाक्य लिहण्यास सांगावी.

- **कल्पक होऊ या:-**

परिचित वस्तूंचे चित्र काढून त्यावर एक-दोन वाक्य लिहिण्यास सांगणे.उदा.बॉल,झाड,बस,चिमणी.

## दिवस -१०

**क्षेत्र- लिपी परिचय**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण ,भाषण, वाचन**

**संबोध /संकल्पना : स्वरचिन्हांचा परिचय : ॲ (ऑ॑ )**

**अध्ययन निष्पत्ती :- वर्णमालेतील ध्वनी व अक्षरे ओळखतात.(इयत्ता –दुसरी)**

### ➢ जाणून घेऊ या :

शिक्षक मुलांना ॲ स्वर लागलेले शब्द सांगण्यास सांगावेत.सूचक प्रश्न विचारून त्यांच्याकडून असे शब्द काढून घ्यावेत. उदा. आपण क्रिकेट खेळण्यासाठी जी लाकडी फळी वापरतो त्याला काय म्हणतात? मुलांनी सांगितलेल्या शब्दांची यादी तयार करावी.

### ➢ सक्षम होऊ या :

फळयावर क, म, ब, र ही अक्षरे लिहावेत.त्यातील ब हे अक्षर घेवून त्याला ॲ ( ॅ )हा स्वर लावल्यावर बॅं होतो हे मुलांना लक्षात आणून द्यावे.

उरलेल्या अक्षरांना अॅं लावू त्याचे मुलांकडून वाचन घ्यावे. कॅ, मॅ, रॅ

बॅट हा शब्द फळयावर लिहतील.हा शब्द फळयावर लिहावे व मुलांना वाचायला सांगावे.बरोबर वाचला की,असे काही शब्द लिहून त्याचे वाचन घ्यावे.




### ➢ सराव करू या :

मुलांना ॲ स्वरचिन्हयुक्त शब्दकार्ड गटात वाचायला द्यावीत व ते लिहायला सांगावे.
मुलांना पाठ्यपुस्तक /वर्तमानपत्र/इतर पुस्तकांमधून असे शब्द शोधायला सांगावेत व त्याची एकत्रीत यादी तयार करावी.

### ➢ कल्पक होऊ या:

शब्दातील ( ॅ )स्वरचिन्ह पुसतील व मुलांना योग्य ठिकाणी ( ॅ )स्वरचिन्ह देवून शब्द पुन्हा लिहायला सांगावेत.

उदा: योग्य ठिकाणी ( ॅ )स्वरचिन्ह लाव व अर्थपूर्ण शब्द तयार कर.

गस, रट, बग, फन, बटरी, सक यासारखे शब्द देतील.

तासिका २) ऑ या स्वरचिन्हाचा परीचय वरील पद्धतीनेच करवून देतील.




**परिशीष्ट-**

| | | | |
|---|---|---|---|
| बॅट | पँट | बॅटरी | सॅक |
| गॅस | रॅक | बँक | अॅना |
| चॅनल | बॅग | फॅन | कॅडबरी |
| हॉटेल | ऑफीस | बॉल | कॅमेरा |
| टिपॉय | कॉट | कॉफी | टॉवेल |
| हॉल | बॉलपेन | टोमॅटो | पॉलीश |
| रॉकेल | कॉलेज | चॉकलेट | सॉस |
| मॉल | नॅपकीन | सँडल | जॉन |

# दिवस -११

क्षेत्र-भाषाभ्यास

**कौशल्य /क्षमता :- श्रवण ,भाषण,वाचन**

**संबोध /संकल्पना :**शब्द साखळी

**अध्ययन निष्पत्ती :- वर्णमालेतील ध्वनी व अक्षरे ओळखतात.(दुसरी)**

- **जाणून घेऊया**

फळयावर ‘कपाट’ हा शब्द लिहावा.लिहलेला शब्द वाचून दाखववावा.वाचून दाखवताना तो क-पा-ट असा तोडून वाचावा.मुलांना कपाट या शब्दातील सुरूवातीला कोणता आवाज ऐकू येतो? मध्ये कोणता आवाज ऐकू येतो? शेवटी कोणता आवाज ऐकू येतो? असे प्रश्न विचारून शब्दातील आवाज लक्षात आणून देतात.आणखी काही शब्दातील आवाज शोधण्याचा सराव घेतात.

- सक्षम होऊया.

दिलेल्या शब्दाचे शेवटचा आवाज( अक्षर ) ऐकून त्या अक्षरापासून सुरु होणारा शब्द सांगण्याचा खेळ घेतात .

उदा.पुस्तक - कपाट -टोपी -परात –तलवार- रूपया इत्यादी .हे शब्द लिहण्यास सांगतात.

- **सराव करू या**

याप्रमाणे दोन गट करून शब्द साखळीचा खेळ खेळतात.
जमीनीवरही शब्द जोडण्याचा हा खेळ घेता येईल. सांगितलेला शब्द अर्थपूर्ण आहे का? सर्व मुलांना शब्दाचा अर्थ माहीत आहे का याची खात्री करतील.

- **कल्पक होऊ या**

सुरूवातीचा शब्द देवून शेवटच्या अक्षरापासून नवीन शब्द लिहण्यास सांगतात. शब्दांची साखळी जास्तीत जास्त लांब होण्यासाठी प्रोत्साहन देतात. सांगितलेल्या शब्दांचा अर्थ लक्षात आणून देतील. त्या शब्दांचा वाक्यात वापर करायला सांगतील.

दिवस -१२

क्षेत्र :- वाचन.

कौशल्य/क्षमता–वाचन

संबोध /संकल्पना : चित्रांच्या जागी शब्द वापरून पाठवाचन

**अध्ययन निष्पत्ती:-** शाळेबाहेर आणि शाळेत आपल्या (वाचनालय/वाचनकोपरा)आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.(इयत्तादुसरी)

- **जाणून घेऊ या.**

○ चित्र मजकुर असलेल्या मजकुरातील चित्रे कोणती आहेत? ते मुलांना विचारावे. चित्रनामे त्यांचे वचन या बाबत चर्चा घडवून आणावी.

- **सक्षम बनू या.**

मजकुर वाचत असताना चित्राच्या जागी कोणता शब्द घालता येईल यावर वर्गात चर्चा घडवून आणावी. चित्राऐवजी शब्द वापरून सर्व मुलांना एक- एक वाक्य वाचायला सांगावे.गरजेनुसार मदत करावी. मुलांकडून पूर्ण मजकूराचे वाचन करून घ्यावे.

शेवटी शिक्षकांनी मजकूराचे प्रकट वाचन करावे.मजकूर समजला आहे की नाही हे तपासण्यासाठी काही सूचक प्रश्न विचारून त्यावर चर्चा करावी.



भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण

• चित्रांच्या जागी योग्य शब्द वापरून पाठ वाच.

एक होती . एके दिवशी घेऊन ती गेली बाजारात. बाजारातून तिने आणल्या आणि स्वयंपाकघरात एका भरून ठेवल्या. आजी बाहेर जाताच टोपलीतून बाहेर पडले एक . ते म्हणाले, ''मी आहे तुमचा राजा, तुम्ही माझे ऐकायचे.'' तोच म्हणाला, ''मी मोठा आहे म्हणून मीच आहे राजा.'' चिडून म्हणाले, ''नाहीच मुळी. मी आहे लालेलाल, मीच आहे राजा!'' म्हणाला, ''माझे ऐका, सर्व भाज्या चवदार करणारा मीच आहे राजा.'' आणि भांडण सोडवण्यासाठी धडपड करू लागली; पण कोणीच ऐकेना. तेवढ्यात परत आली. तिच्या हातात होती. तिने कापला, टोमॅटो चिरले. निवडली, धुतली. उकडले आणि बनवली झकास भाजी! कापून भाजी केली. भाजून भरीत केले. चिरून कोशिंबीर केली. भाज्यांनाही गंमत वाटली. सगळ्यांची एकमेकांशी गट्टी झाली. वाटून चटणी केली. किसून हलवा केला. नातवासाठी वाढले. जेवण मग थाटात झाले.

– रेश्मा बर्वे

१०

- **सराव करू या.**

सरावासाठी असे मजकूर तयार करून मुलांकडून वाचनाचा सराव घ्यावा.

- **कल्पक हो या-**

छोटासा मजकूर देऊन मजकुरात चित्रांचा वापर करून अशाप्रकारचा चित्र मजकूर गटात तयार करण्यास सांगावे.

**दिवस -१३**

**क्षेत्र-भाषाभ्यास**

**कौशल्य/क्षमता – वाचन**

**संबोध /संकल्पना :- शब्दांवरून वाक्य सांगणे व लिहणे.**

**अध्ययन निष्पत्ती:- १) एखादी कथा, कविता स्वता:च्या कल्पनेने पूर्ण करतात. (इयत्ता - दुसरी)**

- **जाणून घेऊ या-:**

शिक्षक फळयावर एक शब्द लिहतात. त्या शब्दाचा वापर करून वाक्य सांगण्यास सांगतात. प्रत्येक विद्यार्थ्यांनी सांगितलेली वाक्ये फळयावर लिहतात. पूर्ण वाक्यात वाक्ये सांगण्यास प्रोत्साहन देतात.

उदा- झाड

- **सक्षम होऊ या-:**

एकाच शब्दावरून जास्तीत जास्त वाक्ये सांगण्यास प्रोत्साहन सांगून त्याची यादी फळयावर करतात. त्या शब्दाआधारे मुलांचा अनुभव मांडण्यास प्रोत्साहन देतात. वेगवेगळ्या प्रकारची वाक्ये तयार होतील यासाठी प्रयत्न करावे. क्लू द्यावेत.

मी चहा पीत नाही.
सारखा चहा पीणे चांगले नाही.
चहा खूप गोड आहे.
मला चहा आवडत नाही.
चहा हवा का?
चहाला दूध नाही.

**चहा**

- **सराव करू या-:**

फळयावर वेगळे शब्द देवून अशाच पदधतीने सामुहिक सराव घ्यावा.

- **कल्पक होऊ या-:**

मुलांना शब्द देवून त्यावर जास्तील जास्त वाक्ये तयार सांगावे.सुरूवातीला गटात व नंतर वैयक्तिकरित्या लिहण्यास सांगावे.

## दिवस -१४

**क्षेत्र-भाषाभ्यास**

**कौशल्य/क्षमता – वाचन**

**संबोध /संकल्पना :-विरामचिन्हे-पूर्णविराम व प्रश्नचिन्ह**

**अध्ययननिष्पत्ती** : शाळेबाहेर आणि शाळेत आपल्या (वाचनालय/वाचनकोपरा)आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.(इयत्ता दुसरी)

विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना विरामचिन्ह, पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करतात.(इयत्ता तिसरी)

- **जाणून घेऊ या :**

> गुणेश सकाळी लवकर उठला. पटपट आवरून तयारही झाला.आईने त्याला दूध दिले. ते त्याने घटाघटा पिऊन टाकले...

फळयावर लिहिलेला उतारा शिक्षकांनी वाचून दाखववा.वाचत असताना वाक्य संपल्यानंतर थांबत होतो हे मुलांच्या लक्षात आणून देतील.वाक्य लिहून संपले की आपण आपण (.) अशी खुण करतो. उताऱ्यात अशा खुणा तुम्हाला कुठे दिसताहेत ते सांगा?अशी सुचना देवून त्यावर चर्चा करावी.

- **सक्षम होऊ या :**

गुणेश सकाळी लवकर उठला .

हे वाक्य उठला या शब्दानंतर संपले म्हणून आपण त्या नंतर (.)असे चिन्ह लिहतो.त्याला पूर्णविराम असे म्हणतात हे मुलांच्या लक्षात आणून देतील.आणखी दोन- तीन वाक्ये देवून पूर्णविरामाची ओळख करून द्यावी. त्यानंतर अशाच पदधतीने प्रश्नचिन्हाची ओळख करून द्यावी. आपण प्रश्न विचारल्यानंतर प्रश्नचिन्ह (?)देतो.हे काही उदा.देवून लक्षात आणून द्यावे.नंतर

राजू गावाला गेला.

फळयावर असे एखादे वाक्य लिहून या वाक्यात प्रश्न विचारला असेल तर प्रश्नचिन्ह ,नसेल तर पूर्णविराम दे अशी सूचना देवून दोन्ही विरामचिन्हांची एकत्रीत ओळख करून द्यावी.

प्रश्नचिन्ह किंवा पूर्णविराम यापैकी योग्य विरामचिन्हे दे.

१)तुझे नाव काय

२)माझे बाबा हॉलीबॉल खेळतात

- **सराव करू या :**

दोन्ही विरामचिन्हांच्या सरावासाठी काही वाक्ये द्यावी.

- **कल्पक होऊ या:**

दोन दोन मुलांच्या जोड्या करून एकाने प्रश्न विचारायचा व दुसऱ्याने उत्तर सांगायचे असा खेळ आलटून पालटून घेता येईल.ही वाक्ये वहीत लिहायला सांगून योग्य विरामचिन्हांचा वापर करण्यास सांगावे.

दिवस -१५

## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे.

### सेतूअभ्यास चाचणी क्र.१

### विषय – मराठी

इयत्ता : तिसरी                                                                 एकूण गुण १०

विद्यार्थ्याचे नाव : ………………………………………………………………………………

प्रश्न १ ) खाली दिलेल्या अक्षरतक्त्यावरून दोन अर्थपूर्ण शब्द बनवून लिही.                    गुण २

| | | | |
|---|---|---|---|
| स | व | फु | स |
| पा | टी | ल | फ |
| ट | स | गो | त |
| क | का | म | वा |
| ब | ळ | त | ह |

१)……………….

२) ……………………

प्रश्न 2) योग्य ठिकाणी (   ) स्वरचिन्ह लाव व अर्थपूर्ण शब्द लिही.( कोणतेही 2 )                    गुण २

१) बग          2) फन          3) मन

प्रश्न 3) खालील वाक्ये वाच व योग्य ठिकाणी प्रश्नचिन्ह किंवा पूर्णविरामयापैकी योग्य विरामचिन्ह दे.    गुण २

१) तू कोठे राहतोस

२) आई माझ्यावर खूप प्रेम करते

प्रश्न ४ ) खालील चित्र नीट बघ व त्यावर आधारित दोन वाक्य लिही.                    गुण २



१)

२)

प्रश्न ५ )खालील शब्दसाखळी पूर्ण कर.                    गुण २

बाग ⟶ गवत ⟶ ---------------

## दिवस -१६

**क्षेत्र : लेखन**

**कौशल्य /क्षमता : वाचन , लेखन**

**संकल्पना : स्वल्पविराम**

**अध्ययन निष्पत्ती** :शाळेबाहेर आणि शाळेत आपल्या (वाचनालय/वाचनकोपरा)आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.(इयत्ता दुसरी)

विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना विरामचिन्हे, पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करतात.(इयत्ता तिसरी)

- **जाणून घेऊ या :**

मी बाजारातून गहू, तांदूळ, साखर, तेलांनी गुळ घेऊन येतो.

हा उतारा शिक्षकांनी फळ्यावर लिहावा.त्यानंतर मुलांना वाचून दाखववावा. वाचून दाखवल्यानंतर मुलांना सूचना वाचत असताना वाक्याच्या मधे मधे मी थोडा वेळ थांबत होतो हे मुलांच्या लक्षात आणून देतील. बाजारातून ज्या ज्या वस्तू आणल्या आहेत त्याच्या मधे मध्ये( , ) आपण अशी खूण करतो. अशी खुण तुम्हांला वरील वाक्यात कुठे कुठे दिसते ? ते विचार व त्यावर चर्चा करा.

- **सक्षम होऊ या :**

  आईने मला आज दप्तर, वही, पेन्सील, पाटी आणली.

  या वाक्यात ज्या अनेक वस्तू आणल्या आहेत त्याच्या मधे आपण ( , ) असे चिन्ह लिहितो त्याला स्वल्पविराम असे म्हणतात हे मुलांच्या लक्षात आणून देतील.आणखी दोन, तीन वाक्य देऊन स्वल्पविरामाची ओळख करून द्यावी. अनेक वस्तू असतील तर त्याच्या मध्ये मध्ये ( , ) आपण हे चिन्ह वापरतो हे लक्षात आणून द्यावे.

- **सराव करू या :**

  स्वल्पविराम सरावासाठी एखादा २,३ ओळींचा परिच्छेद किंवा अजून १,२ उदा.घ्यावीत.

- **कल्पक होऊ या:**

२,३ मुलांचे गट करून पुस्तकातील एखाद्या उताऱ्यात स्वल्पविराम कोठे कोठे आला आहे ते एकमेकांना विचारायला सांगावे व वाक्य वहीत लिहून योग्य तो सराव घ्यावा.

## दिवस -१७

**क्षेत्र :- मौखिक भाषा विकास, लेखन**

**कौशल्य /क्षमता :- वाचन,लेखन**

**संबोध /संकल्पना :** ऐकलेल्या गोष्टी लिहिणे

**अध्ययन निष्पत्ती:-** ऐकलेल्या किंवा मनातल्या गोष्टींना स्वत:च्या पद्धतीने आणि वेगवेगळ्या प्रकारे चित्रं/शब्द वाक्यांद्वारे लिखित स्वरूपात/अभिव्यक्त करतात.(इयत्ता दुसरी)

- **जाणून घेऊ या :-**

शिक्षक, पालक मुलांना गोष्ट सांगतील. त्यावर चर्चा करतील. प्रश्न विचारतील.

- **सक्षम होऊ या:-**

○ शिक्षक, पालक मुलांना ऐकलेल्या गोष्टींवर दोन तीन वाक्यात लिहायला सांगावे.

1. तुला गोष्ट आवडली का ?
2. काय आवडल?
3. गोष्टीत कोण कोण होतं?
4. कोणती समस्या आली का ? असे प्रश्न देवून गोष्टीविषयी लिहण्यास सांगावे.

○ शिक्षक, पालक मुलांना ऐकलेल्या गोष्टींवर एक चित्र काढायला सांगतील. मुले चित्र काढतील. त्यावर मुलांसोबत चर्चा करावी.

- **सराव करू या :**

पाठ्यपुस्तकातील ऐकलेल्या/वाचलेल्या गोष्टीवर प्रतिसादात्मक लेखन करण्यास सांगावे.

- **कल्पक होऊ या:-**

ऐकलेल्या गोष्टीचे नाटयीकरण तयार करण्यास सांगावे. गोष्टीतील पात्रे, वेशभूषा, स्थळ यावर चर्चा करावी. गोष्टीतील पात्रांचे संवाद लिहण्यास सांगता येईल. गरजेनुसार मदत करावी.

## दिवस -१८

**क्षेत्र- लिपी परिचय**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण , भाषण, वाचन**

**संबोध /संकल्पना : जोडाक्षरांची ओळख**

**अध्ययन निष्पत्ती :**शाळेबाहेर आणि शाळेत आपल्या (वाचनालय/वाचनकोपरा)आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.(इयत्ता दुसरी)

विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना विरामचिन्हे, पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करतात.(इयत्ता तिसरी)

- **जाणून घेऊ या :**

फळयावर **ज्याला** हा शब्द लिहून तो मुलांना वाचायला सांगावा. मुलांनी जयाला असे वाचल्यास आपण वाचून दाखवावे.वाचलेला कोणता उच्चार बरोबर वाटतो? (ज्याला की जयाला) हे विचारावे. मुलांनी ज्याला हा उच्चार बरोबर आहे असे सांगितल्यानंतर ज्याला या शब्दातील ज्या मध्ये सुरूवातीला कोणता आवाज ऐकू येतो ?(ज की या?) आपणाला ज हा आवाज पूर्ण ऐकू येतो की अर्धा ? असे प्रश्न विचारून चर्चा करावी.सुरूवातीला ऐकू येणारा ज हा आवाज आपणाला अर्धा ऐकू येतो म्हणून तो अर्धा लिहतात हे लक्षात आणून द्यावे.

- **सक्षम होऊ या :**

**ज्        या**

**ज्   या**

**ज् या**

**ज्या**

ही जोडणी वरीलप्रमाणे फळयावर लिहून त्याप्रमाणेच वाचून दाखवावी. नंतर क्या, प्या, ब्या, म्या, दया, ह्या, त्या, व्या, च्या, ट्या, न्या, द्या अशी जोडाक्षरे फळयावर लिहावी. ज् या ज्या होत असेल तर क्या हे कसं वाचाल? असा प्रश्न विचारून मुलांना जोडाक्षरातील आवाजांचा आकृतीबंध लक्षात द्यावा. मुलांकडून जोडाक्षरांचे वाचन करून घ्यावे.

य अक्षरांची काही जोडाक्षरे फळयावर लिहावीत व त्यांचे वाचन मुलांकडून करवून घ्यावे.गरजेनुसार मदत करावी.

उदा. ज्याला, त्याला, त्यासाठी, त्याचा, आत्या, मोत्या, वहया, पिशव्या, गोटया

- **सराव करू या :**

मुलांना य जोडाक्षरयुक्त शब्दांचे कार्डस गटात वाचायला द्यावेत. ते लिहायलाही सांगावेत. य जोडाक्षरयुक्त शब्दांच्या मजकूरांचेही वाचन घ्यावे.

उदा.-नमुना शब्दकार्ड/उतारा

| | | |
|---|---|---|
| त्याला | मोत्या | त्याच्या |
| माझ्या | आमच्या | राख्या |
| ध्यान | संध्याकाळ | सत्य |
| मोठ्या | म्यानमार | तात्या |
| त्यासाठी | व्यायाम | ध्यास |
| एकलव्य | सामान्य | वेण्या |
| प्यादे | दिल्या | घेतल्या |
| बाहुल्या | गाद्या | संख्या |
| वह्या | अभ्यास | धान्य |

आमच्या घरी मोत्या कुत्रा आहे.
तो मला बघून शेपूट हालवतो.
आमच्या घरी मनीमाऊ आहे.
मला बघून ती पाठ उंच करते.
आमच्या घरी खंड्या घोडा आहे.
मला बघून तो पुढचा पायआपटतो.

- **कल्पक होऊ या:**

सारखा आकृतीबंध असलेल्या जोडाक्षरांच्या यादया पाठ्यपुस्तकातून गटामध्ये बनवायला सांगाव्यात. या याद्या सरावासाठीही वापरता येतील.

उदा.

१)**ह** अक्षराला जोडलेली जोडाक्षरे शोधून त्याच्या यादया करायलला सांगाव्यात.

उदा- म्हणाला, म्हणी, म्हैस, म्हाळसा, न्हाणी, म्हातारी, म्हणून, पुन्हा

२)**स्त** जोडाक्षरे असलेले शब्द शोधून त्याची यादी करण्यास सांगावे.

उदा- कुस्ती, मस्ती, फस्त, जास्त, रास्त, खस्ता, वस्ती, दोस्ती

३) **क्त** जोडाक्षरे असलेले शब्द शोधून त्याची यादी करायला सांगावे.

उदा- रक्त, तक्ता, फक्त, भक्ती, सक्ती, वक्तशीर

## दिवस -१९

क्षेत्र - लेखन

कौशल्य /क्षमता :- श्रवण ,लेखन

संबोध /संकल्पना : श्रुतलेखन

**अध्ययन निष्पत्ती:-** १) शाळेबाहेर आणि शाळेत आपल्या (वाचनालय/वाचनकोपरा)आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.(इयत्ता दुसरी)

- **जाणून घेऊ या :-**

  - शिक्षक मुलांना परिचित साधे दोन - तीन अक्षरी शब्द अचूक उच्चारासह सांगतील.
  - मुले ऐकून शब्द लिहतील.मुलांचे शब्द तपासावेत.
  - चुकलेले शब्द मुलांना लिहण्यास सांगावे.

- **सक्षम होऊ या:-**

  - शिक्षक मुलांना परिचित साधे शब्द, जोडाक्षरयुक्त शब्द अचूक उच्चारासह सांगतील.
  - मुले ऐकून शब्द लिहतील.मुलांचे शब्द तपासावेत.
  - चुकलेले शब्द मुलांना लिहण्यास सांगावे.

- **सराव करू या:-**

इयत्ता दुसरीच्या पाठ्यपुस्तकातील पान क्र. ९ वरील करंगळी,पुरणपोळी या सहा शब्दांचे लेखन करून घ्यावे.

– करंगळी

– पुरणपोळी

– पाकळी

– कळी

– टाळी

– मोळी

- **कल्पक होऊ या:-**

एकाने शब्द, वाक्य सांगावा. दुसऱ्याने लिहावा. पद्धतीने श्रुतलेखन करावे.

# दिवस -२०

**क्षेत्र-भाषाभ्यास**

**कौशल्य /क्षमता :- भाषण,वाचन**

**संकल्पना/क्षमता– व्यावसायिकाला प्रश्न विचारणे**

**अध्ययन निष्पत्ती:- ऐकलेल्या किंवा मनातल्या गोष्टींना स्वतच्या पद्धतीने आणि:वेगवेगळ्या प्रकारे चित्रं/शब चित्रं/शब्द/वाक्यांद्वारे लिखित स्वरूपातअभिव्यक्त करतात.**

- **जाणून घेऊ या-:**

एखाद्या कडून माहित मिळवण्यासाठी आपण काय करतो? यावर चर्चा करावी.आपणाला योग्य उत्तर मिळवण्यासाठी प्रश्न विचारण्याचे महत्त्व का आहे ? यावर चर्चा करतात.

- **सक्षम होऊ या :**

शिक्षकाने कोणत्या व्यावसायिकाला प्रश्न विचारावयाचे आहेत याची तयारी करून ठेवावी.

उदा.-भाजीवाला,

वर्गात एखाद्या मुलाला भाजी विकणा-याची भूमिका द्यावी.शिक्षकांनी सुरूवातीला दोन-तीन प्रश्न विचारून नंतर मुलांना प्रश्न विचारण्यास सांगावे.मुलांनी विचारलेले प्रश्न फळयावर लिहावेत.

उदा.-

तुम्ही भाजी कधीपासून विकत आहात?

तुम्ही दिवसभर कधी भाजी कधी विकता?सकाळी की संध्याकाळी?

तुम्ही भाजी कुठून आणता?

भाजी विकून दिवसाला किती पैसे मिळतात?

तुम्ही भाजी विकण्यासाठी कोणकोणत्या गावाला जाता?

- **सराव करू या-:**

आणखी एखाद्या व्यावसायिकाला प्रश्न विचारण्याचा सराव घ्या.उदा-कुंभारकाम करणारा,सुतार,गवंडी,बस कंडक्टर इ.

- **कल्पक होऊ या-:**

मुलांना वहीवर झाडाचे चित्र काढायला सांगून त्याला कोणते प्रश्न विचारशील?ते प्रश्न लिहायला सांगा.सर्वांचे प्रश्न एकत्र करा.

# दिवस –२१

**क्षेत्र :- लेखन**

**कौशल्य /क्षमता :- वाचन, लेखन**

**संबोध /संकल्पना : स्व-लेखन**

**अध्ययन निष्पत्ती:-**

- **आपल्या जीवनातील आणि परिसरातील अनुभव आपल्या लेखनात समाविष्ट करतात. (इयत्ता दुसरी)**
- **विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना विरामचिन्ह, पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करतात.(इयत्ता-तिसरी)**

- **जाणून घेऊ या :-**
  - शिक्षक,पालक मुलांना परिचित शब्द पाहून लिहण्यास सांगतील.
  - मुले पाहून शब्द लिहतील.
  - मुलांनी लिहलेले लेखन तपासावेत.
- **सक्षम होऊ या:-**
  - शिक्षक मुलांना मुलांच्या लेखनाचे नमुने दाखवतील .
  - परिचित शब्द देऊन लेखन करून घेतील
- **सराव करू या:-**

- **मोठ्याने वाच आणि पाटीवर लिही.**

औसा गावी आमचा दौलतवाडा आहे. मधोमध चौक आहे. तिथे हौद आहे. हौदात कारंजे आहे. चौफेर फुलझाडे आहेत. बाहेर बैलांचा गोठा आहे. आजोबा बैलांना वैरण टाकतात. बैल औत ओढतात.

इयत्ता दुसरीच्या पाठ्यपुस्तकातील पान क्र.१३ वरील उतारा लिहिणे.

या उताऱ्यावर मुलांना प्रश्न तयार करण्यास सांगतील.

- **कल्पक होऊ या:-**
  - परिसरात आजूबाजूला दिसणाऱ्या माणसांच्या संवादाचे लेखन करण्यास सांगणे.
  - घरातीलमाणसे कशी बोलतात याविषयी लिहण्यास सांगणे.

## दिवस -२२

**क्षेत्र- लिपी परिचय**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण ,भाषण,वाचन**

**संबोध/संकल्पना:- जोडाक्षरे प्रकार २**

**अध्ययननिष्पत्ती :**

- **शाळेबाहेर आणि शाळेत आपल्या (वाचनालय/वाचनकोपरा)आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.(इयत्ता दुसरी)**
- **विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना विरामचिन्हे, पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करतात.(इयत्ता तिसरी)**

➢ **जाणून घेऊ या :**

मुलांना एकच अक्षर दोनदा येवून तयार होणाऱ्या जोडाक्षरांचे शब्द शोधायला सांगावेत व त्याची यादी फळयावर लिहावीउदा- गटटा,पटटा,लठठ,सुटटी,चडडी

➢ **सक्षम होऊ या :**

फळयावर लठठ हा शब्द लिहावा या शब्ब्दातील ठठ चा उच्चार जोर देवून कसा करतात ते लक्षात आणून द्यावे. असे फळयावर आणखी शब्द वाचायला द्यावेत.

➢ **सराव करू या :**

मुलांना अशा शब्दांचे कार्डस गटात वाचायला द्यावेत.व हे शब्द लिहायला सांगावे.

➢ **कल्पक होऊ या:**

मुलांना खालील अक्षरे जोडून शब्द बनवायला सांगावे.




उदा- किल्ला

## दिवस -२३

**क्षेत्र- लिपी परिचय**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण, भाषण, वाचन**

**संबोध /संकल्पना :र च्या खुणा प्रकार**

**अध्ययन निष्पत्ती :**

- **शाळेबाहेर आणि शाळेत आपल्या (वाचनालय/वाचनकोपरा)आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.(इयत्ता दुसरी)**
- **विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना विरामचिन्ह,पूर्णविराम,स्वल्पविराम,प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करतात.(इयत्ता तिसरी)**

**दिवस ४ : तासिका दुसरी :इतर जोडाक्षरांचा सराव याच पदधतीने करवून घ्यावा. दिवस ५ जोडाक्षरे र च्या खुणा प्रकार १(१तासिका)**

➢ **जाणून घेऊ या :**

र च्या खुणा असलेले शब्द फळयावर लिहावेत व त्यामध्ये र च्या खुणा कुठे आहेत ते शोधून खुणेभोवती गोल करायला सांगावे.

उदा- प्रकाश, सूर्य, ग्रह, बऱ्याच, पुऱ्या, ट्रक, ट्रेन..........

या शब्दांचे प्रकारानुसार चार गटात वर्गीकरण करण्यास सांगतील

| र च्या खुणा १(प्र) | र च्या खुणा २(र्व) | र च्या खुणा ३(-या) | र च्या खुणा ४ (ट्र) |
|---|---|---|---|
| प्रकाश | सूर्य | बऱ्याच | ड्रम |
| | | | |

➢ **सक्षम होऊ या :**

फळयावर प्रकाश हा शब्द लिहून तो वाचून दाखवतील.

अ) ्र र हा उच्चार प्र कसा होतो हे उच्चारून दाखवतील.

आ) क् + र = क्र (क्रमांक), श् + र = श्र (श्रीमंत), त् + र = त्र (सत्र),

इ) घ् + र = घ्र (व्याघ्र ),

ई) ग् + र = ग्र (ग्रह ),

त्याप्रमाणे ग्र, म्र, क्र, द्र, व्र हे उच्चार कसे होतात हे मुलांना विचारतील. नंतर काही शब्द फळयावर लिहून वाचन घेतील.

उदा- प्रवीण, ग्रहगोल, नम्रता, चक्र, द्राक्षे, पत्र, श्रावणी

➢ **सराव करू या :**

मुलांना अशा शब्दांचे कार्डस गटात वाचायला द्यावेत. व हे शब्द लिहायला सांगावे.

➢ **कल्पक होऊ या:**

मुलांना खालील असे शब्द शोधून त्याची यादी बनावायला सांगतील.

## जोडाक्षरे र च्या खुणा प्रकार २

मध्ये र असलेल्या खुणा असलेले शब्द फळयावर लिहावेत व असे शब्द वाचायला व लिहायला सांगावेत.

उदा-सुऱ्या, पुऱ्या, खऱ्या, बऱ्याचदा, कुऱ्हाड, वऱ्हाड व हे शब्द लिहायला सांगावेत.

असे शब्द शोधायला सांगतील.

## दिवस - २४

क्षेत्र- लिपी परिचय

कौशल्य /क्षमता :- श्रवण, भाषण, वाचन

संबोध /संकल्पना :र च्या खुणा प्रकार

**अध्ययन निष्पत्ती :**

- शाळेबाहेर आणि शाळेत आपल्या (वाचनालय/वाचनकोपरा)आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.(इयत्ता दुसरी)
- विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना विरामचिन्हे, पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करतात.(इयत्ता तिसरी)

**दिवस २३ : जोडाक्षरे र च्या खुणा**

- **जाणून घेऊ या:**

यापूर्वी झालेल्या र च्या खुणा असलेल्या शब्दांचे श्रुतलेखन द्यावे.तपासून सर्वांकडून चुकलेले शब्द दुरूस्त करून वाचन घ्यावे.

- **सक्षम बनू या:**

२)फळयावर सूर्य  हा शब्द  लिहून तो वाचून दाखवतील.

र चा उच्चाराकडे लक्ष वेधतील.तो य पूर्वी होतो व र वर आपण किंचीतसा जोर कसा देतो हे सांगतील.

र् + क् +अ  = र्क  ( तर्क )
र् + व् +अ  = र्व  ( सर्व )
र् + त् +अ  = र्त  ( किर्तन)

असे आणखी काही शब्द फळयावर लिहतील व वाचायला सांगतील.

उदा- पर्व, सर्वात, गर्व, दूर्वा, पर्वत.

३) फळयावर ट्रक  हा शब्द  लिहून तो वाचून दाखवतील.

ट् र  ट्र असा उच्चार करून दाखवतील व र चा उच्चार ट नंतर होतो व तो पूर्ण होतो ते सांगतील.

ट्  + र = ट्र (ट्रक ), ड् + र = ड्र (ड्रायव्हर ),

असे आणखी काही शब्द फळयावर लिहतील व वाचायला सांगतील.

उदा- ड्रेस, ट्रेन, राष्ट्र

- **सराव करू या :**

मुलांना र च्या खुणा असलेल्या शब्दांचे कार्डस गटात वाचायला द्यावे.व हे शब्द लिहायला सांगावे.

- **कल्पक होऊ या:**

मुलांना खालील शब्दात विसरलेल्या र च्या खुणा शोधून त्या देण्यास सांगावे.
उदा-
सूय, दाक्षे, महाराष्ट, कमांक, चो या, द याखो यात, गु हाळ.....

**परिशीष्ट-** र च्या खुणा ३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शर्ट | सूर्य | पूर्व | सर्कस | चर्चा |
| पर्वत | वर्ग | मूर्ख | गर्व | पदार्थ |
| दीर्घ | सर्वात | वर्ष | पर्याय | अर्थात |
| खर्च | चर्च | वर्णन | बर्फ | बर्फी |
| अर्जुन | खुर्ची | शौर्य | धैर्य | पार्वती |
| अर्चना | वर्तुळ | कार्यालय | मर्यादा | ऐश्वर्या |
| घर्षण | पूर्ण | संघर्ष | वर्ग | हार्दिक |

र च्या खुणा ४

| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्र | ड्रम | ट्रक | ट्रीप |
| चंद्र | समुद्र | ट्रिंगट्रिंग | महाराष्ट्र |
| स्ट्रॉबेरी | ऑस्ट्रेलिया | राष्ट्रगीत | ट्रॅक्टर |

# दिवस -२५

**क्षेत्र :- वाचन**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण, भाषण, वाचन**

**संबोध /संकल्पना : कविता वाचन**

**अध्ययननिष्पत्ती-शाळेबाहेर आणि शाळेत आपल्या (वाचनालय/वाचनकोपरा)आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.(इयत्तादुसरी)**



१३. एक तांबडा भोपळा

• ऐकूया. गाऊया.

एक तांबडा भोपळा
विळीवर कापला
त्याच्या उभ्या फोडीमध्ये
अर्धचंद्र लपला

एक तांबडा भोपळा
उन्हात वाळवला
पाठीवरती बांधून
बाळध्या पोहू लागला

एक तांबडा भोपळा
तंबोऱ्याला लावला
कुणी तारा छेडताच
साथ करू लागला

एक तांबडा भोपळा
पाय लावले त्याला
गेला टुणुक टुणुक
घेऊन म्हातारीला

एक तांबडा भोपळा
कुठं होता पळाला ?
गणिताच्या पुस्तकात
जागोजागी मिळाला.

– पद्‌मिनी बिनीवाले

- **जाणून घेऊ या**

➢ शिक्षकांनी कवितेचे तालासुरात, साभिनय सादरीकरण करावे.

➢ विद्यार्थी कविता लक्षपूर्वक ऐकतील.

➢ शिक्षकांनी कवितेची एकेक ओळ तालासुरात म्हणावी, विद्यार्थी त्यांच्या पाठीमागे कविता म्हणतील.

➢ एखाद्या विद्यार्थ्याला कविता म्हणण्यास सांगावे. इतर विद्यार्थी त्याच्या मागे म्हणतील.

➢ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कविता गायन करण्यास सांगावे.

- **सक्षम बनू या**

➢ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कवितेस विविध चाली लावण्याचा प्रयत्न करायला सांगावे.

➢ कवितेत आलेले नादमय शब्द शोधण्यास सांगावे.

➢ पद्य वाचन आणि गदय वाचन यात काय फरक आहे ते कविता गायन घेऊन विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्यावे.

१) मोबाईल मधे कविता ऐकवणे.

२) YouTube वर कविता ऐकणे

३) कवितेचे कृतिसह गायन घेणे, अशाप्रकारे गद्य आणि पद्य वाचन फरक मुलांच्या लक्षात आणून्द्यावा.



• ऐकूया. गाऊया.

फुग्या फुग्या
फुगशील किती ?
आभाळी उंच
जाशील किती ?
पक्ष्यांशी गोष्टी
करशील किती ?
वाऱ्याशी झुंज
घेशील किती ?

ढगांना पार
करणार का ?
ताऱ्यांशी खोखो
खेळणार का ?
गेलास जर का
उंचच फार
चंद्राच्या घरी
मुक्काम मार
जोडून दे
टेलिफोनची तार

रोजच रात्री
गप्पांचा वार
मी म्हणेन,
'हॅलॉव हॅलॉव'
तिथून उत्तर,
'काय हो राव ?'
खरंच ना पण
तू वर जाणार ?
की मधल्यामध्ये
'फट्' म्हणणार ?

– वसुधा पाटील

## ➢ सराव करु या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून कविता गटात/ वैयक्तिक रित्या तालासुरात, साभिनय म्हणण्याचा सराव घ्यावा.
- विविध कविता, बालगीते ऐकण्याची संधी द्यावी.
- कवितांचे कृतिसह गायन घ्यावे.
- कवितेतील यमक जुळणारे शब्द, नादमय शब्द यांचे वाचन घ्यावे.
- कवितेचे लयीत, तालात, टाळ्या वाजवून वाचन करून घ्यावे.

## ➢ कल्पक होऊ या.

- विद्यार्थ्यांनी पुढील कृती कराव्यात.
- पाठ्यपुस्तकात आलेल्या कवितांना वेगवेगळ्या चाली लावा. त्यांचे वर्गात सादरीकरण करा.
- तुला आवडणारे बालगीत कृतीसह वर्गात सादर कर.
- वर्गात असणारी कवितांची पुस्तके बघ,आवडीची कविता वाच, कवितेला चाल लावण्याचा प्रयत्न कर, मित्र मैत्रिणींना कविता गाऊन दाखव.
- यमक जुळणारे शब्द लिहा व ते वापरून कविता तयार करा.

## दिवस-२६

**क्षेत्र- वाचन**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण, भाषण, वाचन**

**संबोध /संकल्पना : प्रकट वाचन**

**अध्ययन निष्पत्ती:- शाळेबाहेर आणि शाळेत आपल्या (वाचनालय/वाचनकोपरा)आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.(इयत्ता दुसरी)**

### • जाणून घेऊ या

आकाशात काळे काळे ढग दाटून आले होते. सगळीकडे अंधार झाला होता. आत्ता तर चारच वाजले होते , तरीही रात्र झाल्यासारखे वाटत होते. अचानक ढगांचा गडगडाट ऐकू आला. वीजा चमकू लागल्या. वारे सुटले. आणि पाचच मिनिटांत धो धो पाऊस कोसळू लागला. ताई आणि मी खिडकीत उभं राहून पाऊस बघत होतो. तेवढ्यात आईने सर्वांसाठी गरमा गरम चहा आणि खारी आणली. पाऊस बघतच खारी खाताना खूप मजा आली.

**शिक्षकांनी याप्रकारचे प्रकटवाचनासाठी उतारे उपलब्ध करून द्यावेत.**

**वैयक्तिक रित्या/ गटात वाचन घ्यावे.**

### • सक्षम बनू या

आज चंदूला खूप भूक लागली होती, कारण आज दररोजच्यापेक्षा जरा जास्तच वेळ खेळला होता. आई भर भर चपात्या लाटत होती. चंदू आईसमोर नाचत नाचत मैदानावर केलेल्या गमती जमती सांगत होता. आई स्वयंपाक करता करता कौतुकाने चंदूचे बोलणे ऐकून गालात हसत होती.

वरीलप्रमाणे छोट्या छोट्या उता-यांचे प्रकटवाचन घ्यावे.

प्रश्न विचारून आकलन तपासावे, जसे की -

१) चंदूला भूक का लागली होती ?
२) आई काय करत होती ?
३) चंदू आईला काय सांगत होता ?
४) या उता-यात आलेल्या जोडाक्षरयुक्त शब्दांना गोल करून वाचन कर.

### • सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाचनासाठी साहित्य उपलब्ध करून द्यावे.

सर्व विद्यार्थ्यांना संधी द्यावी, विविध प्रकारचे वाचन करून घ्यावे.

- **कल्पक होऊ या**

- विद्यार्थ्यांनी पुढील कृती कराव्यात.
- तुम्हाला आवडलेली गोष्ट, उतारा आईला मोठ्याने वाचून दाखवा.
- आवडलेल्या पुस्तकातले नवे शब्द पेन्सीलने गोल करून मोठ्याने वाचा.
- नव्या शब्दांचे अर्थ समजून घेऊन त्या शब्दांचा बोलताना उपयोग करा.

# दिवस -२७

क्षेत्र :- लेखन

कौशल्य /क्षमता :- वाचन,लेखन

घटक : अनुभव लेखन

**अध्ययन निष्पत्ती:-**

**१)आपल्या जीवनातील आणि परिसरातील अनुभव आपल्या लेखनात समाविष्ट करतात. (इयत्ता दुसरी)**

**२)विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना विरामचिन्ह, पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करतात.(इयत्ता-तिसरी)**

- **जाणून घेऊ या :-**

○ शिक्षक वर्गात लिंबू शरबत करण्याची कृती सांगायला लावतील.

○ या कृतीचे वर्णन फळ्यावर लिहतील.

○ मुलांनी बोलीभाषेत व्यक्त केलेले अनुभव लिहावेत.

- **सक्षम होऊ या:-**

○ शिक्षक एखाद्या पाककृतीबद्दल लिहिण्यास सांगतील. उदा. चहा करणे, भाकरी करणे

○ मुलांच्या घरच्या भाषेचा स्विकार करावा.नेमक्या क्रियापदांसाठी मदत करावी. पूर्ण वाक्यात सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.

- **सराव करू या:-**
- आणखी एखादी पाककृती लिहण्याचा सराव वर्गात सामुहिक रित्या घ्यावा.

**कल्पक होऊ या:-**

○ घरात केल्या जाणा-या एका पदार्थाची पाककृती मित्राला लिहून कळव.

क्षेत्र :- वाचन.

# दिवस -२८

**कौशल्य /क्षमता :- श्रवण, भाषण, वाचन**

**संबोध /संकल्पना : जाहिरातवाचन**

**अध्ययननिष्पत्ती- आपल्या स्तरानुसार व आवडीनुसार कथा, कविता, चित्र पोस्टर इत्यादींचे आनंदाने वाचन करून त्याविषयी प्रतिक्रिया देतात प्रश्न विचारतात.(इयत्ता दुसरी)**

## ➢ जाणून घेऊ या

शिक्षकांनी जाहिरात विद्यार्थ्यांना दाखवून चर्चा घ्यावी, प्रश्न विचारून मुलांना जाहिराती बद्दल काय माहित आहे हे जाणून घ्यावे. सूचक प्रश्न विचारावेत -

उदा- अशी जाहिरात तु कुठे कुठे बघितली आहे ?

जाहिरात का देतात? जाहिराती कशा कशाच्या असतात ?

जाहिरात फक्त वर्तमानपत्रातच येते का? शिक्षकांनी जाहिरातीवर असे विविध प्रश्न विचारून मुलांना जाहिरात म्हणजे नेमके काय इथपर्यंत आणावे.




## ➢ सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जाहिरात दाखवावी. गटागटात / वैयक्तिक पातळीवर जाहिरातीचे वाचन करून घ्यावे. विविध प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना जाहिरात समजली की नाही ते पहावे, जसे की

१) ही जाहिरात कशाची आहे ?

२) नाटकाचे लेखक कोण आहेत ?

३) जाहिरातीत कोणाकोणाची नावे आहेत ?

४) बालकांसाठी तिकीटाचा दर किती आहे ?

५) नाटकाचे नाव काय आहे?

६) नाटकाचे ठिकाण कोणते आहे ?

७)सुधीर तिसरीत शिकत आहे त्याला नाटक मोफत पाहता येईल का?

८) बालकांना  तिकीट दर किती आहे?

९) बिस्कीट पुडा कोणाला मिळणार आहे ?

## ➢ सराव करू या .

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या जाहिराती वाचनासाठी उपलब्ध करून द्याव्यात.

## ➢ कल्पक होऊ या

- विद्यार्थ्यांनी पुढील कृती करण्यास सांगाव्यात-
- वर्तमानपत्रातील  एखादी जाहिरात  रेडिओमध्ये ऐकतो तशी  /  टि.व्ही मध्ये ऐकतो तशी वाचण्याचा प्रयत्न कर.

## दिवस -२९

**क्षेत्र :-वाचन**

**कौशल्य/क्षमता– वाचन**

**संबोध/संकल्पना- विनोदवाचन**

**अध्ययननिष्पत्ती–आपल्या स्तरानुसार व आवडीनुसार कथा कविता चित्र पोस्टर इत्यादींचे आनंदाने वाचन करून त्याविषयी प्रतिक्रिया देतात, प्रश्न विचारतात.(इयत्ता दुसरी)**

### ➢ जाणून घेऊ या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही विनोद / विनोदी प्रसंग सांगावे.
- मुले लक्षपूर्वक ऐकतील, त्यातील विनोद कळला की हसतील.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विनोद सांगायला लावावेत.




वरीलप्रमाणे चित्रातून विनोद विद्यार्थ्यांना वाचन करण्यास सांगावे.

### ➢ सक्षम बनू या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून विनोदाचे वाचन करून घ्यावे, विनोद वाचताना तो काही वेळा वाचण्याच्या पद्धतीमुळे ही बदलतो.
- हे विविध प्रकारच्या विनोदांच्या वाचनातून विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्यावे.

### ➢ सराव करू या

शिक्षक विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातील/ उपलब्ध बाल साहित्यातील विनोद वाचायला द्यावेत

वाचलेला विनोद सर्वांना सांग, याप्रमाणे सराव करून घ्यावा.

## ➢ कल्पक होऊ या

- ○ विद्यार्थ्यांनी पुढील कृती कराव्यात.
- ○ या विनोदी प्रसंगाचे वाचन कर, अशा वेगवेगळ्या विनोदांची कात्रणे जमव व वाच.
- ○ वाचलेले विनोद मित्र-मैत्रिणी, आई वडिलांना सांग.



दिवस -३०

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

## सेतू-अभ्यास चाचणी क्र.२

## विषय – मराठी

इयत्ता : तिसरी गुण १०

विद्यार्थ्याचे नाव :.................................................................................

प्रश्न १)लक्षपूर्वक ऐक व शब्द वहीत लिही. गुण २

( श्रुतलेखनासाठी दोन शब्द सांगावेत ,जसे की आमच्या, मोत्या, आत्या, धान्य, उंच, सर्व )

प्रश्न २ ) खालील वाक्य नीट वाच व योग्य ठिकाणी योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिही. गुण २

चिंटू बगळ्या मिनी राजू सर्वजण बागेत जमले.

काय खेळायचे यावर चर्चा सुरु झाली

प्रश्न ३ ) आई ज्यांच्याकडून भाजी विकत घेते त्या भाजीवाल्या काकांना / मावशीना दोन प्रश्न विचार ते इथे लिही . गुण २

१ ) --------------------------------------

२ ) --------------------------------------

प्रश्न ४ ) तुला टी .व्ही. बघताना कोणती जाहिरात जास्त आवडते ? जाहिरातीचे नाव इथे लिही. गुण १

___

___

प्रश्न ५ ) खालील उताऱ्याचे प्रकटवाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही. गुण २

आज शाळेत रांगोळी स्पर्धा होती. शिवानीने रांगोळी स्पर्धेत भाग घेतला होता. ती आज मोराची रांगोळी काढणार होती. तिने लाल, निळा, पिवळा, हिरवा, गुलाबी, जांभळा, काळा असे वेगवेगळे रंग सोबत आणले होते.

अ ) शाळेत कशाची स्पर्धा होती ?

उत्तर ______________________________

आ )शिवानीने कोणकोणते रंग सोबत आणले होते ?

प्रश्न 6 ) पावसात भिजताना काय मजा येते ते दोन वाक्यात लिही. गुण १

___

___

___

___

## दिवस -३१

**क्षेत्र :-वाचन**

**कौशल्य/क्षमता – वाचन**

**संबोध/संकल्पना –कविता वाचन**

**अध्ययननिष्पत्ती- आपल्या स्तरानुसार व आवडीनुसार कथा, कविता, चित्र, पोस्टर इत्यादींचे आनंदाने वाचन करून त्याविषयी प्रतिक्रिया देतात, प्रश्न विचारतात.(इयत्ता दुसरी)**

### ➢ जाणून घेऊ या

- शिक्षकांनी डिंगोरी या कवितेचे तालासुरात, साभिनय सादरीकरण करावे.
- विद्यार्थी कविता लक्षपूर्वक ऐकतील
- शिक्षकांनी कवितेची एकेक ओळ तालासुरात म्हणावी, विद्यार्थी त्यांच्या पाठीमागे कविता म्हणतील.
- एखाद्या विद्यार्थ्याला कविता म्हणण्यास सांगावे. इतर विद्यार्थी त्याच्या मागे म्हणतील.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कविता गायन करण्यास सांगावे.

### ➢ सक्षम बनू या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कवितेस विविध चाली लावण्याचा प्रयत्न करायला सांगावे
- कवितेत आलेले नादमय शब्द शोधण्यास सांगावे.
- पद्य वाचन आणि गदय वाचन यात काय फरक आहे ते कविता गायन घेऊन विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्यावे.

यासाठी

१) मोबाईलमधे कविता ऐकवणे.

२) YouTube वर कविता ऐकणे

३) कवितेचे कृतिसह गायन घेणे,

अशाप्रकारे गद्य आणि पद्य वाचन फरक मुलांच्या लक्षात आणून द्यावा.

### ➢ सराव करू या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून कविता गटात / वैयक्तिक रित्या तालासुरात, साभिनय म्हणण्याचा सराव घ्यावा.
- विविध कविता, बालगीते ऐकण्याची संधी द्यावी.
- कवितांचे कृतिसह गायन घ्यावे.
- कवितेतील यमक जुळणारे शब्द, नादमय शब्द यांचे वाचन घ्यावे.
- कवितेचे लयात, तालात, टाळ्या वाजवून वाचन करून घ्यावे.

## ➢ कल्पक होऊ या

- विद्यार्थ्यांनी पुढील कृती कराव्यात.
- पाठ्यपुस्तकात आलेल्या कवितांना वेगवेगळ्या चाली लावा. त्यांचे वर्गात सादरीकरण करा.
- तुला आवडणारे बालगीत कृतीसह वर्गात सादर कर.
- वर्गात असणारी कवितांची पुस्तके बघ, आवडीची कविता वाच, कवितेला चाल लावण्याचा प्रयत्न कर, मित्र मैत्रिणींना कविता गाऊन दाखव.
- यमक जुळणारे शब्द लिहा. व ते वापरून कविता तयार करा.

## दिवस -३२

**क्षेत्र- लिपी परिचय**

**कौशल्य /क्षमता :- श्रवण, भाषण, वाचन**

**संबोध/संकल्पना: र च्या खुणांचा सराव.**

**ऋ स्वरचिन्हांचा परिचय**

**अध्ययन निष्पत्ती:- वर्णमालेतील अक्षरे व त्यांचे ध्वनी ओळखतात.(इयत्तादुसरी)**

- **जाणून घेऊ या :**

मुलांना **ऋ** अक्षर ओळखता येते का पाहावे. ऋतुजा, ऋषी... असे शब्द वाचायला द्यावेत.
फळयावर वृक्ष हा शब्द लिहून तो वाचून दाखवावा. व त्यात ऋ हा आवाज ऐकू आला का ? हे विचारून त्यातल्या ृ या खुणेला ऋ म्हणतात. हे लक्षात आणून द्यावे व असे शब्द मुलांकडून काढून घेतील त्याची यादी बनवायला सांगतील. उदा. कृपा, वृक्ष

- **सक्षम होऊ या :**

फळयावर क अक्षर लिहून त्याला ृ हे स्वरचिन्ह जोडून त्याचा उच्चार कसा होतो ते सांगावे. काही अक्षरांना स्वरचिन्ह लावून वाचायला सांगावे.

**क क क कृ**

ृ ृ ृ

वृक्ष हा शब्द फळयावर लिहतील व मुलांना वाचायला सांगावे. बरोबर वाचला की, असे काही शब्द लिहून त्याचे वाचन घ्यावे.

- **सराव करू या :**

मुलांना ृ स्वरचिन्हयुक्त शब्दकार्ड गटात वाचायला द्यावेत व ते लिहायला सांगावे.
मुलांना पाठ्यपुस्तक /वर्तमानपत्र/इतर पुस्तकांमधून असे शब्द शोधायला सांगावे व त्याची एकत्रीत यादी तयार करावी.

- **कल्पक होऊ या:**

शब्दातील ृ स्वरचिन्ह पुसतील व मुलांना योग्य ठिकाणी (ृ)स्वरचिन्ह देवून शब्द पुन्हा लिहायला सांगावे.

उदा: योग्य ठिकाणी (ृ)स्वरचिन्ह लाव व अर्थपूर्ण शब्द तयार कर.

कती, गहपाठ, मग, शहामग, अमता, कषी

**परिशीष्ट-**

| | | | |
|---|---|---|---|
| वृक्ष | कृपया | संस्कृती | तृप्ती |
| कृष्णा | अमृता | वसतिगृह | वृष्टी |
| पृथ्वीराज | शृहामग | दृष्टीकोन | ऋतुजा |
| कृपा | कृती | कृत्रिम | कृषी |
| गृहिणी | गृहपाठ | गृहमंत्री | दृश्य |
| नृत्य | पृथ्वी | पृष्ठभाग | मृत्यू |

## दिवस -३३

**क्षमता :- मौखिक भाषा विकास, लेखन**

**कौशल्य /क्षमता :- वाचन, लेखन**

संबोध/संकल्पना: **चित्रावरून लेखन**

**अध्ययन निष्पत्ती:-** १) ऐकलेल्या किंवा मनातल्या गोष्टींना स्वत:च्या पद्धतीने आणि वेगवेगळ्या प्रकारे चित्रं /शब्द वाक्यांद्वारे लिखित स्वरूपात/अभिव्यक्त करतात.(इयत्ता दुसरी)

### ➢ जाणून घेऊ या :-



- शिक्षक,पालक मुलांशी ऐकलेल्या चित्रांवर गप्पा मारतील. त्यावर चर्चा करतील.चित्रांवर अंदाज बांधायला लावणारे,तर्क करणारे प्रश्न विचारतील.
- **आकलन, उपयोजन, विश्लेषण सर्जनशीलता (अभिव्यक्तीच्या) पातळीवर प्रश्न विचारावेत. सर्व विद्यार्थ्यांना बोलते करावे.**
- यासाठी परिचित चित्रांचा वापर करावा.

### ➢ सक्षम होऊ या:-

- **विद्यार्थ्यांना परिचित चित्र दाखवून त्याचे तोंडी वर्णन करण्यास सांगावे.**
- **विद्यार्थ्यांना परिचित चित्र दाखवून त्याचे लेखी वर्णन कसे करावे याबद्दल सांगावे.**
- **चित्रांमधील वस्तूंचे निरीक्षण करून त्याची यादी लिहावी. आपल्या अनुभवाशी चित्र कसे जोडावे. याबद्दल सांगावे. सुरुवातीला चित्रातील वस्तूंची यादी लिहण्यास सांगावी. त्या नंतर त्यातील तपशिलाचे वर्णन करण्यास सांगावे.**

➢ **सराव करू या:-**




○ पाठ्यपुस्तकातील पान क्र. १२ वरील या दोन चित्रांवर दोन -तीन वाक्य लिहण्यास सांगावी. याप्रकारे

पाठ्यपुस्तकातील इतर चित्रांचा वापर करून लेखन करून घ्यावे. बोलीभाषेतील लेखन स्विकारावे.

○ चित्रातील माणसे काय करीत आहेत ते लिही. अशाप्रकारचा सराव घ्यावा.







➢ **कल्पक होऊ या:-**

○ चित्रातील व्यक्तींना परिचित व्यक्तींची नावे देण्यास सांगावी.

○ चित्रावरून छोटी गोष्ट लिहण्यास सांगावी.



# दिवस -३४

**क्षेत्र :- मौखिक भाषा विकास, लेखन**

**कौशल्य /क्षमता :- वाचन,लेखन**

**संबोध/संकल्पना: जोडाक्षरयुक्त शब्दांचे श्रुतलेखन**

**अध्ययन निष्पत्ती:-** ऐकलेल्या किंवा  मनातल्या गोष्टींना स्वत:च्या पद्धतीने आणि वेगवेगळ्या प्रकारे चित्रं /शब्द वाक्यांद्वारे लिखित स्वरूपात/अभिव्यक्त करतात.(इयत्ता दुसरी)

## ➢ जाणून घेऊ या :

- काही जोडाक्षरयुक्त शब्दांचे श्रुतलेखन घ्यावे.
- श्रुतलेखन तपासावे. चुकलेले शब्द दुरूस्त करून वाचून घ्यावेत.

## ➢ सक्षम होऊ या :

- मुलांनी पुस्तकातून जोडाक्षरयुक्त शब्दांची शब्द शोधायला सांगावे.

## ➢ सराव करू या :

- शोधलेले शब्द गटात वाचायला सांगावे.

## ➢ कल्पक होऊ या:

- या  शब्दांचे योग्य गटात वर्गीकरण करून लिहायला सांगावे.

उदा-



**कृती :**

मुलांचे गट पाडून ४ मुलात एक तक्ता वापरावा. मुलांना गोलात बसवून तयार केलेला जोडाक्षर तक्ता व पत्ते त्यांच्या समोर ठेऊन त्यांना चारही गठ्ठ्यातील पत्ते एकत्र करून नंतर चार पत्ते वाटणे व तक्त्याप्रमाणे जोडाक्षरे असलेल्या शब्द रकान्यात ठेवणे.

उदा.

## दिवस - ३५

**क्षमता :- मौखिक भाषा विकास, लेखन**

**कौशल्य /क्षमता :- वाचन,लेखन**

संबोध/संकल्पना**: अनुवाचन**

**अध्ययननिष्पत्ती- शाळेबाहेर/ शाळेत ( वाचन कोपरा/वाचनालय ) आपल्या आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात.**

### ➢ जाणून घेऊ या

○ शिक्षकांनी वर्गात सोपी, सुटसुटीत आशय असणारी चित्रयुक्त गोष्टींची पुस्तके उपलब्ध करून द्यावीत.

○ गोष्टींचा शनिवार या उपक्रमांतर्गत असणा-या कथाही विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करून द्याव्यात. मुलांना स्वत:ला वाचन करण्याची संधी द्यावी.

### ➢ सक्षम बनू या

○ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एखाद्या कथेचे, परिच्छेदाचे, सुस्पष्ट व अचूक उच्चारांसह वाचन करून दाखवावे.

1) शिक्षकांनी एकेक शब्दांचे सुस्पष्ट व अचूक उच्चारांसह वाचन करत मुलांना स्वतः घ्या पाठीमागे वाचन करायला सांगावे.

2) वर्गातील जे विद्यार्थी उच्चार करताना अडखळतात, किंवा मागे पडतात त्यांच्याकडून अधिक सराव करून घ्यावा.

3) एकाच वेळी कथा / परिच्छेद ऐकणे व सोबत वाचणे असा सराव मोबाईलचा उपयोग करून/ प्रत्यक्ष गटात/ YouTube वरील कथेचे वाचन व त्याचवेळी लिखित मजकूर समोर दिसते, या प्रकारच्या कृतींच्या मदतीने वाचन करून घ्यावे.

### ➢ सराव करू या .

- शिक्षक विद्यार्थ्यांना अनुवाचन करण्याच्या विविध संधी उपलब्ध करून देतील.

1) गटात अनुवाचन

2) मोबाईलवर पुस्तकातील पाठ/ कथा ऐकणे व सोबत किंवा मागे म्हणणे.

3) YouTube वर विविध कथा एकाच वेळी ऐकणे व स्क्रिनवर दिसणारा मजकूर वाचणे.

अशा वेगवेगळ्या प्रकारच्या संधीद्वारे शिक्षक अनुवाचन घेतील.

### ➢ कल्पक होऊ या.

○ विद्यार्थ्यांनी पुढील कृती कराव्यात.

○ तुम्हाला आवडलेली गोष्ट मोठ्याने वाचा.

## दिवस -३६

**कौशल्य /क्षमता :- वाचन,लेखन**

**संबोध/संकल्पना: प्रकट वाचन**

**अध्ययन निष्पत्ती-** आपल्या स्तरानुसार व आवडीनुसार कथा, कविता, चित्र, पोस्टर इत्यादींचे आनंदाने वाचन करून त्याविषयी प्रतिक्रिया देतात, प्रश्न विचारतात.(दुसरी)

- **जाणून घेऊ या**

➢ शिक्षकांनी एखाद्या पाठाचे/ कथेचे अचूक उच्चारांसह व सुस्पष्ट आवाजात प्रकटवाचन करावे.

➢ विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतील.

➢ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रकटवाचनाची संधी द्यावी.

➢ विद्यार्थी प्रकटवाचन करतील.

- **सक्षम बनू या**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रकटवाचनासाठी बाल साहित्य उपलब्ध करून द्यावे. वर्गातील वाचन कोपरा, ग्रंथालय येथे मुलांच्या वयोगटानुसार, आवडीनुसार कथा, कविता, चित्र यांची पुस्तके उपलब्ध करून द्यावीत. मुलांना वाचताना चिन्हे, आरोह अवरोह, साहित्य प्रकारानुसार वाचन करताना होणारे बदल यासाठी

१) मोबाईल वरील कथा, पाठ, गोष्टी यांचे प्रकटवाचन रेकॉर्डींग

२) टिव्ही, रेडिओवरील कथा, कवितेचे, पाठाचे प्रकटवाचन,

३) YouTube वर पाठांचे प्रकटवाचन

४) ई- लर्निंगद्वारा प्रकटवाचन

असे विविध पर्याय उपलब्ध करून देऊन मुलांकडून जास्तीत जास्त चांगले प्रकटवाचन होईल यासाठी प्रयत्न करावे.

- **सराव करू या**

I. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ / गोष्ट/ परिच्छेद यांचे गटात / वैयक्तिक रित्या प्रकटवाचन करण्यासाठी संधी द्यावी.

II. वेगवेगळ्या माध्यमातून असे छोटे छोटे परिच्छेद देऊन प्रत्यक्ष मुलांचे प्रकटवाचन घ्यावे. पालक, मित्र- मैत्रिणी, ताई दादा यांच्या मदतीने प्रकटवाचनाची सवय मुलांना लावावी.

III. वाचताना येणारे अडथळे दूर करण्यासाठी मुलांना मदत करावी. जास्तीत जास्त वाचनाची संधी उपलब्ध करून द्यावी.

- **कल्पक होऊ या**

➢ विद्यार्थ्यांनी पुढील कृती कराव्यात.

➢ घरी/ शाळेत / परिसरात उपलब्ध पुस्तके वाचा.

➢ वाचलेला मजकूर आई बाबा, मित्र- मैत्रिणींना सांगा.

➢ कथा, कवितांचा संग्रह करा. ते मोठ्याने वाचा.

## दिवस - ३७

**क्षेत्र :- मौखिक भाषा विकास, लेखन**

**कौशल्य /क्षमता :- वाचन, लेखन**

संबोध/संकल्पना:- **तक्ता/ दिनदर्शिका वाचन**

**अध्ययन निष्पत्ती** – **आपल्या स्तरानुसार व आवडीनुसार कथा, कविता, चित्र, पोस्टर इत्यादींचे आनंदाने वाचन करून त्याविषयी प्रतिक्रिया देतात, प्रश्न विचारतात.**

### ● जाणून घेऊ या

शिक्षकांनी आपल्या वर्गातला व वर्गाचे वेळापत्रक मुलांना दाखवावे.

त्यावर आधारित विविध प्रश्न विचारावेत, जसे की-

१) हे काय आहे ?

२) याचा आपल्याला काय उपयोग होतो ?

३) आपल्या वर्गाचे वेळापत्रक नसेल तर काय होईल ?

४) विषय , वेळ , वार लिहिल्यामुळे काय फायदा झाला ?

५) असेच आणखी कोणकोणत्या ठिकाणी तुम्ही रकान्यात लिहिलेली / तक्त्यात लिहिलेली माहिती पाहिली आहे ?

अशाप्रकारचे प्रश्न विचारून विद्यार्थींना रकाना/ तक्त्यात लिहिलेली माहिती म्हणजे कमी शब्दात जास्तीत जास्त माहिती पोहचणे हे लक्षात येईल इथपर्यंत आणून पोहोचवावे.

### ➢ सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिनदर्शिका दाखवावी.

दिनदर्शिकेच्या वाचनाकडे विविध प्रश्नांतून आणावे, जसे की-

१) तुमच्या घरी तुम्ही अशी दिनदर्शिका पाहिली आहे का ?

२) या दिनदर्शिकेतून आपल्याला काय माहिती मिळते ?

३) वार कोठे लिहिले आहेत ?

४) महिना कोठे लिहिला आहे ?

५) सर्व महिन्यात दिवसांची संख्या सारखीच आहे का ?

६) वार किती आहेत ?

७) महिने किती आहेत ?

८) इंग्रजी महिने व मराठी महिने यांची नावे वाच.




अशाप्रकारे विविध प्रश्न विचारून मुलांकडून दिनदर्शिकेचे वाचन करून घ्यावे.

## ➢ सराव करू या

शिक्षक विद्यार्थ्यांकडून दिनदर्शिकेचे वाचन करून घेतील.




दिनदर्शिकेचे वेगवेगळे पाने वाचनास देऊन, त्यावर आधारित प्रश्न विचारावेत.

## ● कल्पक होऊ या

➢ विद्यार्थ्यांनी पुढील कृती कराव्यात.

➢ आपल्या वर्गातील सर्व मुला-मुलींचे वाढदिवस आपल्या वर्गातील दिनदर्शिकेवर दाखवा, कोणाच्या वाढदिवशी कोणता वार येतो ते वाचा.

१) कोणाकोणाचे वाढदिवस सुट्टीच्या दिवशी आलेत ते वाचा आणि सांगा.

२) यावर्षी रक्षाबंधन कोणत्या इंग्रजी महिन्यात व कोणत्या वारी आले आहे ते सांग.

३) तुझ्या कुटुंबातील सर्वांचे वाढदिवस दिनदर्शिकेत शोधून वाच.( महिना, वार, तारीख)

## दिवस - ३८

**क्षेत्र :- वाचन**

**कौशल्य /क्षमता :- वाचन, लेखन**

संबोध/संकल्पना:- **वाचनपाठ**

**अध्ययन निष्पत्ती-** शाळेबाहेर / शाळेत ( वाचन कोपरा /वाचनालय ) आपल्या आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात. (इयत्ता दुसरी)

- **जाणून घेऊ या**



• **वाच. शिक्षकांकडून समजून घे.**

व्यवस्थितपणा म्हणजेच सुंदरता. कोणतेही काम वेळच्या वेळेस करणे, कोणतीही वस्तू नीट जागेवर ठेवणे, पैशांचा व्यवस्थित हिशेब ठेवणे, दिलेल्या शब्दाप्रमाणे वागणे, तिकिटे रांगेत नीट उभे राहून घेणे, रांगेमध्ये उभे राहून बसमध्ये शिरणे... शेकडो गोष्टी व्यवस्थितपणात येतात.

साने गुरुजी

- शिक्षकांनी परिच्छेदाचे विद्यार्थ्यांना वाचन करण्यास सांगावे.
- विद्यार्थी प्रकटवाचन करतील.
- शिक्षकांनी परिच्छेदातील कठीण शब्द व त्यांचे अर्थ सांगावे.

### ➢ सक्षम बनू या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अशाच पद्धतीचे वाचनपाठ वाचनासाठी उपलब्ध करून द्यावे.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून या पद्धतीने विविध प्रकारचे वाचन
- वाचन पाठ /उतारे उपलब्ध
- प्रश्न विचारून आकलन तपासावे.



• पत्र वाचूया. नावाऐवजी आलेले शब्द ओळखूया.

प्रिय गौरी,

तू कशी आहेस...?. मी दुसरीत शिकत आहे. माझी शाळा खूप छान आहे. तुम्ही सर्व एकदा माझ्या शाळेत या. आम्ही सर्व तुमच्याकडे येणार आहोत. तू आणलेली भेळ, सफरचंद खूप छान होते. मला तुझी खूप आठवण येते.

तुझी मैत्रीण,

मयुरी

- **सराव करू या**

➢ शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून वाचन पाठाचे प्रकटवाचन करून घ्यावे.

➢ वाचनासाठी वाचन साहित्य उपलब्ध करून द्यावे, जसे की मराठी साहित्य पेटीतील वाचन पाठ,उजळणी पुस्तिकेतील वाचन पाठ.

➢ प्रकटवाचन करताना हळू हळू सराव, करुन वाचनाकडे मुलांना न्यावे.

➢ प्रश्न विचारून आकलन तपासावे.




- **कल्पक होऊ या**

➢ विद्यार्थ्यांनी पुढील कृती कराव्यात.

➢ पाठ्यपुस्तकात आलेले वाचन पाठ मोठ्याने वाचा.

➢ आवडीच्या पुस्तकातील एक पान मोठ्याने वाचा.

## दिवस -३९

**क्षेत्र :- वाचन.**

**कौशल्य /क्षमता :- वाचन,लेखन**

संबोध/संकल्पना: **जोडाक्षरयुक्त शब्दवाचन**

**अध्ययन निष्पत्ती-** **शाळेबाहेर / शाळेत ( वाचन कोपरा /वाचनालय ) आपल्या आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात. (इयत्ता दुसरी)**

- **जाणून घेऊ या**

शिक्षकांनी फळयावर काही परिचित जोडाक्षर युक्त शब्द लिहून त्यांचे वाचन घ्यावे.
विद्यार्थी जोडाक्षर युक्त शब्दांचे वाचन करतील.

- वाच. पाटीवर लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| हसऱ्या | चेहऱ्याची | सर्वांना | मित्र |
| मैत्रिणी | लगोऱ्या | क्रिकेट | माझ्यासाठी |
| थांबल्या | ट्रॅक्टर | पाहुण्यांना | गप्पा |
| अभ्यास | प्रश्न | गोष्टीचे | पुस्तक |
| म्हणाली | झाल्यावर | सर्वांची | सर्वजण |

➢ **सक्षम बनू या**

- शिक्षकांनी नव्याने आलेले/ अपरिचित जोडाक्षर युक्त शब्द फळयावर लिहून / शब्दकार्ड / तक्ता यांच्याद्वारे विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करून द्यावे. विद्यार्थ्यांना जोडाक्षर युक्त शब्द वाचनाचा सराव द्यावा.
- गटात / वैयक्तिक रित्या या शब्दांचे प्रकटवाचन घ्यावे.

## वाचूया, लिहूया

- शब्द वाच आणि लिही.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्र | चक्र | क्रिकेट | क्रमांक | विक्रम |
| श्र | श्रम | श्रावण | श्रीमंती | श्रीधर |
| र्थ | अर्थ | विद्यार्थी | प्रार्थना | तीर्थरूप |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| म्ह | आम्ही | म्हैस | म्हणाला | तुम्हाला |
| त्स | वत्सला | उत्सव | उत्साह | संवत्सर |
| स्व | स्वर | स्वाती | स्वागत | स्वामी |
| न्ह | चिन्ह | उन्हाळा | तान्हा | कान्हा |
| श्च | पश्चिम | आश्चर्य | निश्चित | निश्चय |
| ष्ठ | ज्येष्ठ | निष्ठा | पृष्ठ | श्रेष्ठ |
| च्च | सच्चा | कच्चा | गच्ची | उच्चार |

➢ **सराव करू या**

स्नेहा आई सोबत बाजारात गेली. बाजारात खूप गर्दी होती. रस्त्यावर माणसांची वर्दळ होती. फळांच्या गाड्या बाजारात जातानाच दिसल्या. स्नेहाला द्राक्षे हवे होते. सर्व भाज्या घेऊन झाल्या की फळे घेऊन घरी जाऊ असे आई म्हणाली.

- असे जोडाक्षर युक्त शब्द असलेले उतारे वाचनासाठी उपलब्ध करून द्यावे व त्यात आलेल्या जोडाक्षर युक्त शब्दांचा सराव घ्यावा.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तकातील तसेच मुले वर्गात/ घरी जे साहित्य वाचतील त्यातील जोडाक्षर युक्त शब्दांचे प्रकटवाचन घ्यावे.
- गटात /वैयक्तिक रित्या वाचनाची संधी द्यावी.

- **कल्पक होऊ या**

➢ विद्यार्थ्यांनी पुढील कृती कराव्यात.

➢ घरी गोष्ट वाचताना गोष्टीमधील जोडाक्षर युक्त शब्दांच्या खाली पेन्सीलने रेष मारा, नव नवे जोडाक्षर युक्त शब्द शोधून ते वाचा.

## दिवस -४०

**क्षेत्र :- मौखिक भाषा विकास, लेखन**

**कौशल्य /क्षमता :- वाचन,लेखन**

संबोध/संकल्पना: **अनुभव लेखन**

**अध्ययन निष्पत्ती:- १) आपल्या जीवनातील आणि परिसरातील अनुभव आपल्यालेखनात समाविष्ट करतात. (इयत्ता दुसरी)**

**२) स्वतच्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरविलेल्या कृतीअंतर्गत:जागरूकतेने व स्व नियंत्रित पद्धतीने लेखन- करतात. (इयत्ता तिसरी )**

- **जाणून घेऊ या :-**
  - शिक्षक फळ्यावर पाऊस या शब्दावर लिहितील.
  - पावसाचे वर्णन करताना स्वत:चा अनुभव लिहतील.
  - मुलांना तो वाचून दाखवतील.मुलांना अशाच प्रकारचा एखादा अनुभव सांगण्यास सांगतील.
- **सक्षम होऊ या:-**
  - शिक्षक परिचित शब्दावर लेखन करण्यास सांगतील. उदा. शाळा, झाड, पाऊस
  - परिचित शब्दावर मुलांनी लिहलेल्या लेखांत मुलांनी आपले अनुभव लिहिलेले आहेत का? हे पाहतील.
- **सराव करू या**

I. शिक्षक मुलांनी स्वत:चे अनुभव लिहण्यास सांगतील .
II. त्यांच्या अनुभवात त्यांनी त्यांच्या जगण्यातील अनुभव लिहिलेले आहेत काय हे
III. पाहतील.
IV. बोली भाषेतील अनुभव स्विकारतील.

- **कल्पक होऊ या**

शिक्षकांनी मुलांचे अनुभव गटात वाचायला देऊन त्यावर चर्चा आयोजित करावी.

# दिवस- ४१

क्षेत्र :- लेखन

कौशल्य /क्षमता :- वाचन, लेखन

संबोध/संकल्पना: अनुभव लेखन

**अध्ययन निष्पत्ती:- १) एखादी कथा, कविता स्वतच्या कल्पनने:ने पूर्ण करतात. (इयत्ता - दुसरी)**

**२) विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना विरामचिन्ह, पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करतात.(इयत्ता-तिसरी)**

- **जाणून घेऊ या :-**

शिक्षक मुलांना दोन तीन वाक्य सांगतात. त्यानंतर विद्यार्थ्यांना कल्पनेने पुढील वाक्य सांगायला सांगतात.अशा प्रकारे मुले गोष्ट तयार करतात.

उदा. दुपारची वेळ होती. अचानक वादळ आले.........

- **सक्षम होऊ या:-**

  - शिक्षक विद्यार्थ्यांना दोन-तीन वाक्य देऊन छोटी गोष्ट लिहायला सांगतात.
  - विद्यार्थी गोष्ट लेखन करतील.
  - स्वत:चे अनुभव लिखाणात आलेले आहेत काय हे शिक्षकांनी पाहावे.
  - बोलीतील शब्द स्विकारावेत.

- **सराव करू या:-**

- **कविता पूर्ण कर.**

आकाश होते निळे निळे  
ढग आले .......................  
वारा सुटला सोंऽ सोंऽ  
पाऊस आला .......................

- **कल्पक होऊ या:-**

  - कविता लिहण्याचा प्रयत्न करा.

## दिवस - ४२

क्षेत्र :- लेखन
कौशल्य /क्षमता :- वाचन, लेखन
संबोध/संकल्पना: अनुभव लेखन

**अध्ययन निष्पत्ती:- १) एखादी कथा, कविता स्वतच्या कल्पने:ने पूर्ण करतात. (इयत्ता - दुसरी)**
**२) विविध उद्दिष्टांसाठी लेखन करताना विरामचिन्ह, पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करतात.(इयत्ता-तिसरी)**

- **जाणून घेऊ या :-**



- शिक्षक मुलांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगतील . त्यावरून दोन वाक्य सांगतील.
- त्यानंतर मुलांना पुढील वाक्य सांगण्यास सांगतील. तोंडी गोष्ट पूर्ण करून घेतील.

- **सक्षम होऊ या:-**

- शिक्षक विद्यार्थ्यांना दोन-तीन वाक्य देऊन छोटी गोष्ट लिहायला सांगतात.
- विद्यार्थी गोष्ट लेखन करतील.
- स्वत:चे अनुभव लिखाणात आलेले आहेत काय हे शिक्षकांनी पाहावे.
- बोलीतील शब्द स्विकारावेत.

- **सराव करू या:-**
  - पाठ्यपुस्तकातील पान क्र.४१ वरील चित्राचे निरीक्षण करून त्यावर कथा लिहा .
  - शिक्षक चित्रावर एक दोन वाक्य लिहून देतील.
  - पुढील कथा विद्यार्थी पूर्ण करतील .
- **कल्पक होऊ या:-**
  - कथेसाठी सुरवातीची एक - दोन वाक्ये लिहून घ्यावी.
  - त्यानंतर त्यांना कथा लिहिण्यास सांगावी.

क्षेत्र :- लेखन

कौशल्य /क्षमता :- वाचन, लेखन

संबोध/संकल्पना :वाचनपाठ वाचन, लेखन

## दिवस - ४३

**अध्ययन निष्पत्ती-** शाळेबाहेर/शाळेत ( वाचन कोपरा /वाचनालय ) आपल्या आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात. (इयत्ता दुसरी)

- **जाणून घेऊ या :-**

घटक १.७

### पताका

मेघना ये. नयना ये.
केतन ये. चेतन ये.

मेघना, नयना पताका कापा.
केतन, चेतन पताका कापा.

नाना या. काका या.
या पताका पहा.

मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न – १) पताका कोणी कोणी कापल्या?
२) पताका कोणाला दाखविल्या?

९

LBL : 2018-19

○ शिक्षक विद्यार्थ्यांना वाचनपाठ वाचायला देतील.

○ त्यांना त्यावरील प्रश्न विचारतील.

- **सक्षम होऊ या:-**

घटक २.२

### परी लपली

परी दारामागे लपली.
आईने हाक मारली.
पण परी बाहेर आलीच नाही.

आईने चकलीची बरणी आणली.
बरणीत हात घालताच परी नाचत बाहेर आली.

मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न – १) परी कुठे लपली?
२) परीला हाक मारताना आई काय म्हणाली असेल ते कल्पना करून लिही.
३) परीला चकली आवडते हे मजकुरातील ज्या वाक्यावरून कळते ते वाक्य पुढे लिही.

१४

LBL : 2018-19

- शिक्षक विद्यार्थ्यांना वाचनपाठ वाचायला देतील.

- त्यांना त्यावरील प्रश्न विचारतील.
- विद्यार्थी समजपूर्वक वाचन करत आहेत काय हे पाहतील.

- **सराव करू या:-**


घटक २.३

# नवा तबला

घरी नवा तबला आणला.
आईने पाहिला. बाबाने पाहिला.
रमानेही पाहिला. आईने तबला वाजवला.
रमानेही तबला वाजवला.
बाबाने तबला वाजवलाच नाही!

मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न – १) कोणी कोणी तबला वाजवला?
२) बाबाने तबला का वाजवला नसेल?

- शिक्षक विद्यार्थ्यांना वाचनपाठ वाचायला देतील.
- त्यांना त्यावरील प्रश्न विचारतील.
- विद्यार्थी समजपूर्वक वाचन करत आहेत काय हे पाहतील.

असे वाचनपाठ मुलांना वाचयला देतील.

- **कल्पक होऊ या:-**

○ मुले लहान लहान वाचनपाठ लिहितील

दिवस - ४४

क्षेत्र :- लेखन

**कौशल्य /क्षमता :- वाचन, लेखन**

संबोध/संकल्पना : **प्रश्न तयार करणे.**

**अध्ययन निष्पत्ती- शाळेबाहेर / शाळेत ( वाचन कोपरा /वाचनालय ) आपल्या आवडीच्या पुस्तकांची निवड करून वाचण्याचा प्रयत्न करतात. (इयत्ता दुसरी)**

- **जाणून घेऊ या :-**

शिक्षक मुलांना चित्राचे निरीक्षण करायला लावतील.



- त्या समजावण्यासाठी प्रश्न कसे विचारावेत हे समजून सांगतील.

- **सक्षम होऊ या:-**

हे डॉक्टर थॉमस डिसूझा. तू यांना यांच्या कामाविषयी प्रश्न विचार. ते खाली दिलेल्या जागेत लिही.



______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

- **सराव करू या:-**

ही जाहिरात नीट वाच.




शिक्षक जाहिरातीवर प्रश्न तयार करण्यास सांगतील. शिक्षक मुलांना प्रश्न कसे तयार करावेत याबद्दल मार्गदर्शन करतील. काही नमुना प्रश्न तयार करून दाखवतील.

- **कल्पक होऊ या:-**

पाठ्यपुस्तकातील आवडीच्या चित्रांवर प्रश्न तयार करतील.

दिवस- ४५

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे.**

**सेतू-अभ्यास चाचणी क्र.३**

**विषय – मराठी**

इयत्ता : तिसरी गुण २०

विद्यार्थ्यांचे नाव :-----------------------------------------------------------------------

प्रश्न १)लक्षपूर्वक ऐक व शब्द वहीत लिही. गुण २

( श्रुतलेखनासाठी दोन शब्द सांगावेत ,जसे की चुंबक, जादूगार, त्याच्या, साऱ्या)

प्रश्न २) खालील वाक्य नीट वाच व योग्य ठिकाणी योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिही. गुण २

काका मामा काकी काकू गावाहून आले

गावाला गेलो होतो

प्रश्न ३)

या शीलाताई आहेत. त्या बस कंडक्टर आहेत. तू त्यांना त्यांच्या कामाविषयी तीन प्रश्न विचार. ते बाजूला दिलेल्या जागेत लिही. (३ गुण)



प्रश्न ४ ) पुढील चित्राचे निरीक्षण करून पाच-सहा वाक्यात वर्णन कर. **५ गुण**



प्रश्न ५) पुढील उतारा वाचून पुढील प्रश्नांची उत्तरे सांग ? ४ गुण

घटक ३

## कोकमचे सरबत

काका काल कोकणातून आला. काकाने कोकमचे सरबत आणले. लाल लाल दाट सरबताची बाटली मीनाला फारच आवडली. लगेच तिने चार कप पाणी घेतले. सरबत बनविले. आईला एक कप दिले आणि बाबाला एक कप दिले. दोघांनाही सरबत फारच आवडले. राहिलेले सगळे सरबत मीनाने घेतले. कारण काकाला कोकमचे सरबत आवडतच नाही.

मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –
१) कशाचे सरबत बनवले?
२) काका कुठून आला?
३) मीनाने किती कप सरबत बनविले?
४) मीनाला किती कप सरबत प्यायला मिळाले?

टीप :आमसूल म्हणजे कोकम या झाडाचे लालसर रंगाचे फळ, ते खूप आंबट असते. कोकणात आमसूलाचा उपयोग आमटी, भाजीत टाकण्यासाठी करतात.

प्रश्न ६) चौकटीतून अर्थपूर्ण शब्द शोधून लिही ? गुण ४

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दो | ड | का | मा | बां |
| कौ | ला | रू | सा | ग |
| सै | ल | शे | ग | डी |
| नि | ळा | पू | र | मा |
| क | पा | ट | के | ळी |

___ ________________ ________________

___ ________________ ________________